प्रकरण दुसरे

# कृष्णराव भालेकर यांचे पद्यसाहित्य

प्रकरण दुसरे

# कृष्णराव भालेकर यांचे पद्यसाहित्य

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात आपणास कृष्णराव भालेकरांच्या पद्य साहित्याचा अभ्यास करावयाचा आहे. मध्ययुगीन मराठी साहित्याशी अतूट नाते सांगणारी भालेकरांची कविता आहे. यामध्ये पोवाडे, अभंग, लावणी, पदे, श्रीखंड, स्फुट काव्यरचना असे विविध काव्यप्रकार भालेकरांनी हाताळले आहेत.

या पद्य साहित्यामध्ये भालेकरांनी 'पोवाडे', 'हितोपदेश', 'शेतकऱ्यांचे मधुर गायन', 'भालेकरकृत उपदेशपर लावणी', 'श्रीखंड' त्याचबरोबर 'कलियुगाचे भय' ही स्फुट काव्यरचना यांचा समावेश केला आहे. या काव्यरचनेतून ग्रामीण जीवन यथार्थपणे मांडण्याचा उद्देश आहे. शेतकरी-कष्टकरी, जनतेची सुख-दुःखे मांडली आहे.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयात संतकाव्य, पंडितीकाव्य आणि शाहिरीकाव्य असे तीन मुख्य प्रवाह दिसून येतात. संत काव्यामध्ये भक्ती विचार, पंडिती काव्यात गौरव विचार व शाहिरी काव्यात मुख्यतः मानवी जीवनाचे लौकिक प्रतिबिंब उमटलेले आहे. शाहिरी वाङ्मयात पोवाडा व लावणी हे दोन कवितेचे मुख्य प्रकार आहेत. ''पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, सामर्थ्याचे गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय प्र+वद म्हणजे ठासून स्तुती करणे.''[१] अशी पोवाड्याची व्याख्या केली जाते. तर लावणी ही शृंगाररसाने ओतप्रेत भरलेली, मानवी भावभावनांनी ओथंबलेली असते. शाहिरी काव्यातून सामाजिक दुष्काळ, देशस्थिती वर्णनपर, वीरांचा पराक्रम, समाजाची सुखदुःखे यांचे चित्रण येऊ लागले.

कृष्णराव भालेकरांनी एकूण सात पोवाडे लिहिले आहेत. त्यामध्ये 'आमचे कारागीर 'पूर्वीची व सांप्रतची स्थिती', 'कलगीतुरा, शिवशिक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती', 'रघुगाडीवानाचा पोवाडा', 'लोकल फंडाचा पोवाडा', 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ', 'लोकल फंडाचा पोवाडा' व 'अनार्यांचे गाऱ्हाणे' यांचा

समावेश होतो. अज्ञानी, अशिक्षित शेतकऱ्यांच्या हृदयविदारक सत्य परिस्थितीचे वर्णन या पोवाड्यातून केले आहे.

**१) आमचे कारागीर :**

भारतीय कारागीरांच्या विपन्नावस्थेचे चित्रण करणारा भालेकरांचा हा पोवाडा महत्त्वाचा आहे. या पोवाड्यातून भारतीय कारागीर, शेतकरी, मजूर यांची तुलना परदेशातील कारागीरांशी केलेली आहे. भारतीय कारागीर हे दारिद्र्याने गांजलेले आहेत. 'अज्ञान' व 'दारिद्र्य' या रोगाने त्यांना पछाडलेले आहे. त्यामुळे आपला देश इतर जगाच्या मानाने कितीतरी पटीने मागे आहे. याचे कारण सांगताना भालेकर म्हणतात –

"अडाणपनाने देश बुडाला कारागीरी थकली ।।
संपत्ति अज्ञपणे मुकली।।धृ. ।।
पहा आमचे साळी कोष्टी कष्ट करून मरती ।।
कशाने डोके व्हावे वरती "[२] ।।१ ।।

आपल्या देशातील कारागीर रात्रंदिवस काबाडकष्ट करतात. त्याबरोबर त्यांची बायका मुले ही राबतात. तरी त्यांना पोटभर अन्न मिळत नाही. आपला देश अधोगतीस जाण्यास 'अज्ञान' व 'आळस' हे दोन घटक कारणीभूत बनले आहे. या देशातील कारागीरांच्याजवळ विद्या, बुद्धी व धन या गोष्टींची कमतरता असल्यामुळे ते अज्ञानी राहिले आहेत.

"आमचे लोहार घिसाडी पुरे चालाख मेहनती । परंतु विद्येची कमती ।।२ ।।
इंग्रजी लोहार पहा यंत्राने यंत्रे घडिती। कशा यंत्राने धातू अटिती"[३] ।।३।।

उलट परदेशातील कारागीरांजवळ अद्यावत यंत्रसामुग्री व उच्चतंत्रशिक्षण यांच्या साहाय्याने –

"घड्याळ दुर्बिणी करिती । आगबोट पहा गाड्या बळकट
किती ओझी आणिती । सुरक्षित जलदीने नेती ।।४।।
लोखंडी पोलादी हत्यारे लाखां वरती ।

सुया टाचण्या करा गणती''[४] ।।५।।

ब्रिटीशांचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर लहान लहान उद्योगधंदे करणारे कोष्टी, सुतार आणि लोहार यांच्याकडेही पूर्वीसारखे काम चालेना. कारण परदेशातून भारतात येणाऱ्या मालाशी भारतीय कारागीर स्पर्धा करू शकत नव्हते. आपल्या देशातील कच्चा माल नेऊन त्यांच्या देशात पक्का करुन तो अधिक किंमतीत विकला जात असे. त्याचा परिणाम असा एतद्देशीय व्यापाऱ्यांचा धंदा अतिशय खालावला. त्यामुळे कोष्टी, लोहार, सुतार यांना विपन्नावस्था प्राप्त झाली. असा प्रकारे भारतीय कारागीर, हत्यारे, यंत्रे यांची तुलना इंग्रजी कारागीर, हत्यारे, यंत्रे यांच्याशी केली आहे.

इंग्रजी कारागीरांचा विकास त्यांच्या अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने झाला आहे. त्यांचे सरकार नवीन योजने बाबत प्रोत्साहन देत असते. मात्र आपल्या देशात –

''राजे रजवाडे देती देणग्या तमासगिराशी । जाणिना कारागिराशी''[५] ।।६।।

भारतीय कारागीरांना पुढारी, राजे सहकार्य करीत नाहीत यासाठी भालेकर देशातील कारागीरांना उपदेश करतात–

''भवसागर हा तरुन जाया बुद्धी हेच तारू । नका हे कोणी कधी विसरू ।

विद्या शिकण्याने इंग्रज लोक कसे गबरू झाले आहेत. म्हणून जगाचे तेच आज गुरु बनले आहेत. म्हणून –

''कारागीराशी विद्या नाही गोष्ट मोठी चुकली ।

संपत्ति अडाणपणे मुकली हो''[६] ।।७।।

या पोवाड्यातून कृष्णराव भालेकरांनी उद्योगधंद्याच्या ऱ्हासाची कारणे सांगून, कारागीरांना त्यांच्या विपन्नावस्थेची जाणीव करून दिली आहे. शेतकऱ्यांचे हाल कसे होतात. भारतीय कारागीर यंत्रे, हत्यारे व सरकार यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. बारा बलुतेदारांच्या शोषणाचे वर्णन केले आहे. या लोकांच्या जीवनांशी भालेकरांचे अगदी जवळचे नाते आहे. लोहार, सुतार, कोष्टी वगैरे मंडळींनी या लोकांनी एकत्र येऊन

कारखान्यांची उभारणी करावी. उद्योगांची भरभराट करुन सुधारणा अंमलात आणाव्यात असा तत्कालीन समाजाच्या दु:स्थितीवरचा तोडगा भालेकर सुचवितात.

**२) पूर्वीची व सांप्रतची स्थिती :**

कृष्णराव भालेकरांनी आपल्या देशाच्या दयनीय अवस्थेचे वर्णन 'पूर्वीची व सांप्रतची स्थिती' या पोवाड्यातून केले आहे. पेशवाई व ब्रिटीश राजवटीची तुलना करुन पेशवाईच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत.

''पहा इंग्रजाची जूट। नाही कधी फूट।

करूनी कूट। नाही घोटाळा नाही आळस ना कंटाळा''[७] ।।८।।

असे इंग्रजी आमदानीचे वर्णन केले आहे. इ.स.१८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली आणि इंग्रजी राजवट आली त्यामुळे देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक स्थितीत बदल घडून येऊ लागले. या बदलाच्या पूर्वीची स्थिती व इंग्रजी राज्यकर्ते आल्यानंतरची स्थिती याचे वर्णन भालेकरांनी या पोवाड्यातून केले आहे -

''हिदुस्थान देश फार भोळा। सोन्याचा गोळा। सर्वांचा डोळा।

जग जाहीर। लिहतीग्रंथ गाती शाहीर ''[८] ।।९।।

इंग्रजी राजवट येथे येण्यापूर्वी बाजीराव पेशवा पूर्णपणे ऐषाअराम, चैन, रंगविलास यांच्या आहारी गेला होता. ब्राह्मण भोजन, धार्मिक अनुष्टाने, व्रतवैकल्ये, फंदफितुरी या गोष्टींना ऊत आला होता.स्नानसंध्या, सोवळे-ओवळे, कर्मकांड, नैतिक शिथिलता इत्यादींनी समाज पोखरला होता, सरंजामशाही, राजेशाही चातुर्वण्ये, भोळसर धर्मश्रद्धा, भौतिक विद्यांकडे दुर्लक्ष या प्रवृत्तींनी महाराष्ट्र क्षीण व दुर्बल बनला होता. ''आपसात। घरादारात। जातीधर्मात। कावा आळसांचा, हाच पाया देश नाशाचा'' त्यामुळे देशाला कुणीही वाली उरले नव्हते. शूद्रातिशूद्रांच्या हिताच्या बाबतीत वाढतीत उदासीन झालेली पेशवाई आपल्याच नाकर्तेपणामुळे आणि जातिवर्ण संकुचित मनोवृत्तीमुळे बुडाली. इंग्रजी राजवटीत नवे कायदे, न्यायव्यवस्था व राजव्यवस्था प्रस्थापित झाली, यामुळे इंग्रजाच्या एकसूत्री व एकछत्री अंमल सुरू झाला. भौतिक विद्यांचे शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन

झाल्य, मुद्रणालये स्थापन झाली. त्यामुळे ग्रंथनिर्मिती व ग्रंथप्रसार यांना चालना मिळाली. जीवनाच्या राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अंगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. यामुळे देशात स्थित्यंतर घडून आले. कायद्यांचे राज्य आल्यामुळे जनतेला दिलासा मिळाला येथे भालेकरांनी ब्रिटीश राजवटीची कारणमीमांसा केली आहे. इंग्रज सरकारने देशात निरनिराळ्या सुधारणा केल्या –

> ''विद्याखाते की न्यायखाते। लष्करीखाते।
> मुलकीखाते। धर्मदवाखाने। गिरण्या छापखाने''[९] ।।१०।।

अशा विविध सुविधा सुरू केल्या. देशामध्ये इंग्रजांनी प्रशासनाचा पाया भक्कम केला. देशामध्ये सुधारणा घडवून आणल्या तर बाजीरावाच्या काळामध्ये कशाप्रकारे जनतेला त्रास दिला. ते सांगताना भालेकर म्हणतात –

> ''उफराटे टांगी बिनधोक । फोडी पाट चिंचेचा फोक ।
> मिरच्याची धुरी खालून । लुटमाट हक्क बोलून ।
> राखेचा तोबरा तोंडा । डोईवर देऊनी धोंडा।
> नाजुक जागी चापूनी । नेई माल गळा चेपूनी''[१०] ।।११।।

असे हृदय पिळवटून टाकणारे वर्णन भालेकरांनी केले आहे.

इंग्रजांच्या आगमनानंतरच्या स्थितीचे वर्णन करताना भालेकर म्हणतात –

> ''आगबोट पळे सागरात। गाडी दिनरात । धावे जोरात अचाट ओझ्याशी।
> दररोज कोस दोनशांसी । कशी मजा''[११] ।।१२।।

असे शोध लावून इंग्रजांनी आपल्या देशाचा चेहरामोहराच बदलला उद्योगधंदे, कारखानदारी, शिक्षण यांच्या विकासाला चालना दिली. अशा अनेक सुधारणा घडवून आणल्यामुळे इंग्रज लोक हे आपल्या देशाला मिळालेली 'दैवी देणगी'आहे असे म्हटले जाते. नवी प्रशासन व्यवस्था, शिक्षण पद्धती, नीती, धर्म, विज्ञान यांचा सर्वांगीण विकास झाला. पेशवाईतील जुलूम व इंग्रजी राजवटीतील न्यायव्यवस्था यांचे वास्तव चित्रण या पोवाड्यामध्ये केले आहे.

### ३) कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती :

मराठी शाहिरीच्या क्षेत्रात मुख्य दोन पक्ष मानले जातात. एक 'कलगीवाले' व दुसरे 'तुरेवाले' 'कलगी' व 'तुरे' हे दोन्ही शब्द मराठीत फारशी भाषेतून आले आहेत. असे जोशी यांनी म्हटले आहे कलगीवाले हे शक्तीचे उपासक होते. तर तुरेवाले हे शिवाचे उपासक होते.[१२]

कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणाऱ्यास भालेकरांनी या पोवाड्यातून विनंती केली आहे. ते म्हणतात –

''शिवशक्तीचा शोध लावूनी शिकला गायाला। नका हो सोडू न्यायाला।।धृ.।।

शिवशक्तीची नावे ठेविली कोणी कोणाची। शंका दूर करा आमची''[१३]।।१३।।

निरर्थक वाचाळ बडबड करू नका सांगताना भालेकर म्हणतात –

''मित्ती कोणती शिवशक्तीच्या सांगा जन्माची। कळू द्या अनादि काळाची'' ।।१४।।

शिव आधी की शक्ती? आकाश मोठे की पृथ्वी मोठी, वेद-वैदिक यासारख्या विषयांवर वाद घालणाऱ्या लोकांना भालेकर म्हणतात –

''समुद्र उपशीत बसता ही का सेवा जगाची । काढिता चित्रे ढगांची''[१५]।।१५।।

अशक्य असणाऱ्या गोष्टी लोकांना सांगून आपला व्यर्थ वेळ वाया घालवतात. कलगीतुऱ्यामुळे जरी आनंद मिळत असला तरी ते क्षणिक सुख असते. जीवन जगण्यासाठी समाजाच्या प्रबोधनासाठी याचा कलगीतुऱ्यापासून काहीही उपयोग होत नाही. म्हणून भालेकरांनी खडसावून विचारले आहे.

''कलगीतुऱ्यांचे गाणे गाता काय शोधिले। कोणत्या-पुण्य बोधिले''[१६]।।१६।।

यामुळे काही समाजसेवा घडत नाही, समाजाचे प्रबोधन होत नाही. –

''बुद्धी कल्पना वेळ विद्या व्यर्थ घालविता। व्यर्थ तरकट चालिवता''[१७]।।१७।।

म्हणून भालेकरांनी कलगी-तुऱ्याचा उद्योग बंद करावा अशी विनंती केली आहे.

सतत उद्योग करणे हेच खरे 'दैव'आहे. परोपकार हे पुण्य आहे. परपीडा हे पाप समजावे, सत्यवाणी व सदवर्तन हे व्रतवैभव आहे. सर्व मानवप्राणी एकच आहेत. अशा दुजाभाव न करता नीतीमतेने वागणे असे विचार भालेकरांनी या पोवाड्यातून मांडले आहेत ते म्हणतात–

''वाद पेरुनी भांडत बसता भेद भासविता । शंका घेता फसविता''[१८] ।।१८।।

या व्यर्थ वादामुळे देश रसातळाला गेला आहे. येथे भालेकरांनी देश लयाला जाण्याची कारणे सांगितली आहेत या पोवाड्यातून अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला आहे. अज्ञान, भोळेपणा व मागसलेपणा देशाच्या अधोगतीस जबाबदार घटक आहेत. हे त्यांनी परखड शब्दांत व्यक्त केले आहे.

## ४) राघू गाडीवानाचा पोवाडा :

शेतकऱ्यांना वेठीस धरण्याच्या पध्दतीमुळे त्याच्यावर ओढवणाऱ्या दु:खाचे चित्रण करणारा भालेकरांचा हा पोवाडा आहे. शेतकऱ्यांची स्थिती त्यांच्यावर होणारे जुलूम, अन्याय, आर्थिक शोषण, सामाजिक विषमता, अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्यता याचे सत्य व हृदयभेदक चित्रण या पोवाड्यातून केले आहे. राघू नावाचा गरीब शेतकरी कडबा घेऊन विकण्यासाठी शहरात गेला होता. तीनवार होऊन गेले तरी तो घरी परत आला नाही त्याची आई त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. यावेळी तिला समजते की –

''नेली राघूची गाडी धरूनी आली खबर । कळता वाटे हुरहूर''[१९] ।।२०।।

राघू हा म्हतारीचा पंचप्राण आहे. तिला आपल्या राघूची चिंता लागून राहिली आहे. राघूला पकडून नेल्यामुळे ती निराधार झाली आहे. घरी –

''मुले आजारी सून बाळंतीण त्यात सावकार । पेरणी घाताचा घोर''[२०] ।।२१।।

चोहोबाजूने तिच्या कोंडमारा झाल्याने ती म्हतारी काय करू शकते. असा तिच्यावर मोठा प्रसंग येऊन ती रडत असते. असा हा भालेकरांनी करुणाजनक प्रसंग उभा करुन 'राघू गाडीवाना'च्या पोवड्याची रचना केली आहे.

राघूची गाडी अडवल्यानंतर त्याने एका शिपायाला ''दिले आणे काढून गेला शिपाई दारु पिऊन'' दसऱ्या शिपायाने राघूची गाडी मामलेदारापुढे नेऊन उभी केली आहे ''हानित मारित नेले बैल शेपूट ही रगडी'' अशावेळी राघूला मामलेदारापुढे उभे केले. त्याने हुकूम सोडल्यावर त्याचे शिपाई सांगतील तिकडे त्याला गाडी घेऊन जावे लागले. यावेळी त्याला आई, बायको, मुले, घरदार यांची आठवण येऊ लागली. मामलेदार त्याची कुचेष्ठा करित शिपयांना हुकूम सोडतो –

''झाला न्याय लाथा द्याव्या। भरावी गाडी । शिपाई झोंबले गोचडी।।२२।।
घेती सूड हट्टा पेटूनी गाडी मोडीती ओझी आपटूनी।।२३।।
धाय धाय राघू रडूनी छाती दाटली टाहो फोडूनी ।।२४।।
शिपायास हात जोडूनी म्हणे ''जातो गाडी सोडूनी''[२१]।।२५।।

मामलेदार व शिपायांनी राघूचे खूप हाल केले. या प्रसंगामुळे अंतकरण हेलावून जाते. यातून शेकऱ्यांच्या दु:खाची, दैन्याची बीजे स्पष्ट झाली आहेत.

''पहावेना बैलाचे दु:ख तसे हाल आपुले । मन शोकाने व्यापिलेले''[२२]।।२६।।

एके दिवशी सर्व शिपाई झोपी गेलेत हे पाहून राघू त्यांच्या तावडीतून निसटून घरी येतो. त्यावेळी...

''पेरणीवाचुन शेत बुडाले सावकार उठले । सर्व जप्तीने घेरले''[२३] ।।२७ ।।

भालेकरांनी राघूवर आलेल्या बिकट प्रसंगाचे वर्णन केले आहे. मन कसे हेलावून जाते अशा शब्दांत वर्णन केले आहे. याची दाद कोणाकडे मागायची हे माहित नाही. याची तक्रारसुद्धा करून न्याय मिळणार नाही. यामुळे राघूला अन्याय सहन करावा लागतो. या पोवाड्यातून भालेकरांनी शेतकरी ग्रामीण जीवनाचे चित्र हुबेहूब रेखाटले आहे. शेतकऱ्यांना वाली कुणीही उरला नव्हता. त्यांचे दु:ख दूर करणारा कुणीही नव्हता. म्हणून भालेकरांनी व्हिक्टोरीया राणीने एकदा येऊन आमच्या शेतकऱ्यांची स्थिती पहावी. येथील कायदे तपासून पहावेत अशी विनंती केली आहे.

'राघू गाडीवाना'चा पोवाडा हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शेतकऱ्यांना वेठीस धरण्याच्या पद्धतीवर बंदी आणावी यासाठी पोवाड्याची निर्मिती केली आहे. यामध्ये करुणरसाचा उत्कट आविष्कार झाला आहे. शिपायांसाठी 'गोचिडी' व 'मानवी पारध' हे शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत. अडाणी, गरीब शेतकरी कसा नाडला जातो याचे भालेकरांनी ज्वलंत उदाहरण देऊन ग्रामीण जीवनाचे चित्रण डोळ्यासमोर उभे केले आहे. शेतकरी वर्गाचे दुखणे, सावकारी पाश, त्यांना मिळणारी वागणूक, त्यांच्या जन्माला लागलेलं ते भीषण दारिद्र्य, त्यांचे असहाय्यपण या सर्व गोष्टींचे यथातथ्य वर्णन भालेकरांच्या या पोवाड्यातून दिसून येते.

### ५) लोकल फंडाचा पोवाडा

कृष्णराव भालेकरांचा हा अत्यंत महत्त्वाचा पोवाडा आहे. तत्कालीन समाज स्थितीचे वर्णन करणारा पोवाडा आहे. शूद्रांकडून मिळालेल्या कष्टाच्या पैशांतून लोकल फंड निर्माण झाला. हा फंड शेतकऱ्यांकडून सरकार कशाप्रकारे वसूल करते याचे वर्णन या पोवाड्यातून केले आहे.

मुंबई इलाख्यातील सर्व शेतकरी लोक दरवर्षी २० लक्ष रुपयांवर लोकल फंडाबद्दल रक्कम देत असत. आज सुमारे ४० वर्षांत ८० कोट रुपये नुसता लोकल फंड म्हणून सरकारला ऐवज दिला जातो. याशिवाय आमचे शेतकरी इंग्रज सरकारच्या एकंदर उत्पन्नात मोठी रक्कम भर म्हणून देत आहेत. असे लोकल फंडाचे वर्णन केले आहे. शेतकऱ्यांनी मातीत घातलेले धान्य पिकले नाही तरी त्यांना सारा दिलाच पाहिजे. सरकारचा रोकडी सारा भागविण्यासाठी गाडी भाडे तोडे इकडे तिकडे करू लागले म्हणजे जागोजागी टोल नाक्यावर जकात द्यावी लागते. शेतकरणी आपल्या नवऱ्याबरोबर शेतात काम करण्यास फुरसत मिळावी. म्हणून आपल्या मुलांना अफूची गोळी चढवून निश्चिंत पाडतात. शेतकऱ्यांनी अफू व दारूचे उत्पन्न सुरू केले. जरा पैशांची सवड झाली की, शेतकरी व्यसनांच्या आहारी जातात. या उत्पन्नातून शेतकरी मोठी रक्कम कराच्या स्वरूपात सरकारास देऊ करतो. शेतकऱ्यांना काही नसेल तरी भाकरी भाताबरोबर मीठ तर खाण्यास पाहिजे. मिठाच्या

उत्पन्नात लोकसंख्येच्या प्रमाणात बऱ्याच तुंबड्यांनी शेतकऱ्यांचे रक्त शोषून घेतले जाते. सरकारच्या तिजोरीतून पैसा व भत्ता खाऊन लाच खाणाऱ्या नोकरांकडून शेतकरी चुना तंबाकूपर्यंत शोषला जातो. अशा अनेक मार्गांनी सरकार कर वसूल करते. या बदल्यात सरकार शेतकऱ्यास काय देते? पिको न पिको रोख उत्पन्न दिले पाहिजे. अशाप्रकारे शेतकऱ्यांकडून सारा ठरावाने वसूल केला जातो. यातून जुलमी अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य भालेकरांनी केले आहे.

'लोकल फंड देत आलो कानु कायदा सोसून ।।

गुरे ढोरे घरेदारे वतन वस्तु विकून''[२४] ।।धृ. ।।२८ ।।

दुष्काळ वा इतर कारणामुळे शेतात काही पिकले नाही. तरी लोकल फंडाच्या वसुलीच्या कायद्यामुळे गुरे, ढोरे, घरदार, वस्तू विकून शेतसारा द्यावा लागतो. म्हणून या पोवाड्यातून शेतकरी सरकारला जाब विचारतात.

''लाखामागे कोण किती विद्यार्थी आमचे पढले ।

सहा कोटीचे सहा दाखवा कोठे कोण वर चढले?''[२५] ।।२९ ।।

शेतकऱ्यांची दखल घेणारा कायदा कौन्सिलमध्ये, विद्या खात्यामध्ये कोणी उरला नाही म्हणून शेतकरी म्हणतात, ''चला जाऊ शरण विद्येशी काय होते भटकून?'' या शब्दांत आपले विचार मांडले आहेत.

शेतकऱ्यांच्या बैल, दुभत्या गाई, शेळी, म्हैशी हाकून नेऊन ती जनावरे विकून याच पैशावर हे अधिकार चैन करत असतात, मटण, ब्रांडी, पोळी बासुंदी पुरती'' अशा जेवणावर ताव मारतात. सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी आपले घर भरतात. मात्र शेतकरी लुगडी, घोंगडी गहाण ठेवून कर्ज भरत असतो. याच पैशावर फेटन ग्याने बंगले बगीचे राजवाडे या उलट शेतकऱ्याचे कर भरण्यातच आयुष्य जाते. याचे वास्तव चित्रण भालेकरांनी रेखाटले आहे. यातून आपणास गरिबी व श्रीमंती यांच्यातील तफावत दिसून येते. अंमलदार सावकार लोकांनी शेतकऱ्यांना चोहोकडून बेजार केले आहे. त्यात मोठी भर पाऊस, किडक्या रोगाची पक्षी, पशू, ठग, सरकार, सावकार, शेटजी यांची आहे. त्याबरोबर शनी भटाची पिडा,

अडाणी बारा बलुते, व्यसन, आळशी, परंपर रोगदुर्गुण, लोकलफंड ही साडेसाती शेतकऱ्यांच्या मागे लागली आहे. म्हणून शेतकरी असे म्हणतात –

''साऱ्या घेतो नाही दमला। तट्टू नाही मानव आम्ही देऊ ओझी फेकून''[२६] ।।धृ. ।।३० ।।

शेतामध्ये शेतकऱ्यांची बायकामुले दिवसभर काबाडकष्ट करतात. याच्या उलट ब्राह्मण, शेठ, सावकार यांची मुले शिक्षण घेतात. पण शेतकऱ्यांची मुले अक्षर ओळख होताच शाळेत जावयाची थांबत होती. अर्धशिक्षण घेतलेली ही मुले शेतकीच्या कामात उपयोगी पडत नाहीत यावर भालेकर म्हणतात –

''मुले आमची अर्धकच्ची शिकून होती निकामी
कष्ट होईना काही कळेना डौल ढोंगी रिकामी ''[२७]।।३१ ।।

या पोवाड्यातून भालेकरांनी शेतकऱ्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लोकल फंडाच्या ओझ्याखाली वाकलेल्या शेतकऱ्याला 'नका गड्यांनो हिंमत सोडू म्हणे भालेकर खडकून' अशा शब्दांत आवाहन केले आहे.

**६) दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ :**

दक्षिण महाराष्ट्रामध्ये पुणे, सातारा, नगर, कलादगी, सोलापूर या जिल्ह्यात दुष्काळाने कहरच केला होता. या दुष्काळाचे प्रलंयकारी चित्रण 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाड्यातून केले आहे. दुष्काळात झालेल्या वाताहतीची कारणे भालेकरांनी सांगितली आहेत.

'हिंदुस्थान सोन्याचा तुकडा' म्हणून आर्य, यवन, मुसलमान, फ्रेंच, इंग्रज या परकीयांनी देशांवर आक्रमण केले. या देशाचा मूळ मालक शेतकरी यांना लुटले. देशावर वरचेवर हल्ले करून कोट्यावधी लोकांचे प्राण घेतले. 'ज्याचा माल त्याचे हाल' आपला देश म्हणजे एक धर्मशाळा झाली आहे. व्यापारी म्हणून येतात आणि राज्यकर्ते बनतात. कोणीही येतो 'लुटून खातो' तरी 'नाही दृष्टी घरधन्याला', कोणीही देशाच्या हिताचा विचार करत नाही म्हणून हा प्रसंग आला आहे. याचवेळी भारतात खूप मोठा दुष्काळ पडला आणि

शेतकऱ्यांचे खूप हाल झाले. 'कर्जाखाली गेले बुडोनी शेतकरी झाले ठार' भट, कुलकर्णी, मारवाडी यांनी व्याजावर व्याज चढवून बेजार केले आहे. लोकल फंडामुळे तर शेतकरी भीकेस लागले आहेत. या कर्जाच्या ओझ्याखाली शेतकरी अधिकच बुडू लागला आहे. पाऊस पडावा यासाठी ब्राह्मणांनी जप, अनुष्ठाने चालविली पण त्याचा उपयोग झाला नाही. उलट दुष्काळाने हाहाकार उडविला आहे. आषाढ, श्रावण येऊन गेला. अश्विनाचा दसरा आला धान्य खूप महागले. शेतकऱ्याला औतकाठी, गुरेढोरे विकून घरदारे सोडावी लागली. अशी शेतकऱ्याची दयनीय अवस्था झाली आहे. याचे वर्णन करताना –

"चिंचोक्याचा, भुसकोंड्याचा भाजीपाल्याचा मारी गोळा।
निवडुंगाच्या फण्या बोंडांनी केला साजरा सण पोळा"[२८] ।।३२ ।।

या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना अत्यंत हलाखीचे दिवस आले होते. "खाण्याजोगे कोठें दिसता सर्वांचा त्यावर डोळा", असे भालेकरांनी रौद्ररूप धारण केलेल्या भीषण दुष्काळाचे वर्णन केले आहे.

दुष्काळाच्या भीषण रुपाने शेतकरी वर्गातील काही लोक अन्न पाण्याविना तडफडून मेले. या दुष्काळात सात लक्ष लोक मृत्यूमुखी पडले होते. खेडोपाडी उद्‌ध्वस्त झाली. त्या करुण अवस्थेचे वर्णन भालेकर म्हणतात –

"खेड्यापाड्यांची दाणादाण। कुटुंबाची ताणाताण।
लोक पसरले रानोरान।, नाही पाहिलें पुन: ठिकाण"[२९] ।।३३ ।।

या दुष्काळाचे वर्णन भालेकरांनी मनाला चटका लावणारे केले आहे.

पुणे, काशी, वाई येथे फक्त ब्राह्मणांसाठी अन्नदान चालू केले होते. भुकेकंगाल, गरीब शेतकऱ्यांकडून सक्तीने कामे करून घेतली जात असत. या गरीब जनतेवरच्या जीवावर व्यापारी श्रीमंत होऊन बसले. मात्र या शेतकऱ्यांना अन्न मिळत नव्हते म्हणून भालेकरांनी जाती भेदभावावर कडक टीका केली आहे. अन्न पाण्यावाचून तडफडणारे लोक, प्रेताचे ढिग, सरकारने दुष्काळग्रस्त लोकांना मदत करताना जातीय भेदभाव या सर्व गोष्टींमुळे कर्जबाजारी

शेतकरी अधिकच दु:खाच्या खाईत लोटला आहे. यासाठी म्हणे भालेकर ''अन्नसत्रे नको; विद्यासत्रे घाला'' हा विचार भालेकरांनी या पोवाड्यातून व्यक्त केला आहे.

जनसामान्यांसाठी बाजू मांडणारे, त्यांच्या समस्यांची दखल घेणारे भालेकर हे बहुजन समाजातील संवेदनशील मनाचे कवी होते. तत्कालीन मराठी कवितेत १८७७ च्या दुष्काळाचे वर्णन करणारा समाजनिष्ठ शाहीर म्हणून भालेकरांचा उल्लेख करावा लागेल. जिव्हाळा व कारुण्यांनी ओतप्रोत भरलेल्या या पोवाड्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**७) अनार्यांचे गाऱ्हाणे :**

भालेकरांचा 'अनार्यांचे गाऱ्हाणे' हा पोवाडा गाऱ्हाणे मांडणारा आहे. मानवी हक्कांचे मागणे मागण्यासाठी या पोवाड्याची निर्मिती झाली आहे. एका अनार्यांचे आर्याविरूद्ध, अतिशूद्राने शूद्रांविरूद्ध तर अस्पृश्याने स्पृश्याविरूद्ध तक्रार केली आहे.

आर्य लोक येण्यापूर्वी, वेदांचे आगमन होण्यापूर्वी हा देश शूद्रातिशूद्र, अनार्यांचा होता. काळ्या लोकांच्या हक्कांचा होता. वायव्य दिशेकडून आलेल्या आर्य व अनार्याचे युद्ध झाले. व जे या युद्धात हरले त्यांना गुलाम बनविले. या गुलाम बनविलेल्या अनार्यांच्या स्थितीचे वर्णन –

''थुंकू नये रस्त्यांत मडके गळ्यांत बांधिले जाताना शहरीं।।
पावलांसाठी फास कमरी ।।३४ ।।
पोटाच्या आगीपुढे प्राणी चरफडे, अभक्षाची नाही चाड ।।
पशु प्रेताच्या काय पाड''[३०] ।।३५ ।।

अशा शब्दांत वर्णन केले आहे. अनार्यांना सर्व हक्कांपासून वंचित ठेवले होते. हे हक्क मिळविण्यासाठी भालेकरांनी या पोवाड्यातून अनार्यांचे गाऱ्हाणे मांडले आहे.

सत्ता हे उन्नतीचे साधन आहे. मूळ सत्ता या रहिवाशांची होती. हे सर्व लयाला जाऊन अनार्य देशोधडीला लागले होते म्हणून भालेकर म्हणतात –

''शहाणे तुम्ही म्हणविता, कीर्ती मिरविता, काय केले आम्हांसाठी।
पुरे करा गोड गोष्टी ।।३६ ।।

15432

ठेविला आम्ही भरवसा, परिणामीं असा कसा दगा दिला।

घात सर्वस्वी कसा केला''[३१] ।।३७।।

आर्यांनी स्वत:स श्रेष्ठ समजून ग्रंथाची निर्मिती केली आहे. या ग्रंथाची रचना ही त्यांनी स्वत:च्या फायद्यासाठी करून घेतली. की जेणे करून शूद्रातिशूद्र अज्ञान राहतील व ते अज्ञानी जळमटातून बाहेर पडणार नाहीत. याची काळजी घेऊन ''मूळ विद्याधन सुखाचे, बीज ज्ञानाचे आपुल्या स्वाधीन ठेविलें इतरा विन्मुख लाविले''. कारण त्यामध्ये त्यांचे हित होते. म्हणून अनार्यांना गुलाम बनविले होते.

''पागोटे फाटके डोई। तिनदां पाही। चावते काय म्हणुनी। कशाची नारंगी बिन्नी।

निशाणी काठी लंगुटी। रकट्याशी गांठी जाईना। थंडी हुडहुडी। कशाची गरम शालजोडी।।

अंगात काही नाही, अनवाणी पायी, मिळेना जोडा तो जोठ।। कशाचा बूट तो कोट''[३२] ।।३८।।

या पोवाड्यातून अनार्यांच्या हालअपेष्टा, कष्ट, श्रम यांचे वर्णन केले आहे. तर दुसऱ्या बाजूला आर्यांचा ऐषआराम, चैनविलास, ऐश्वर्य याचे यथार्थपणे वर्णन केले आहे. या विसंगतीतून आर्य व अनार्य यांच्या जीवनातील तफावत जमीन आणि अस्मानाएवढी आहे. अनार्यांचे दु:ख, दैन्य, कष्ट परिणामकारकपणे रेखाटले आहे.

या अनार्यांच्या जीवावर आर्य सुखी झाले आहेत. त्यामुळे त्यांना सत्तेची खूप अंदाधुंदी चढली होती. पण ब्रिटीश राजवटीमुळे शांतता प्रस्थापित झाली. यामुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय सुधारणा घडून आल्या. त्यामुळे भालेकर इंग्रज सरकारला 'दयाळू राजा' असे म्हणतात. आर्यांच्या अशा वर्तनाविरूद्ध गाऱ्हाणे मांडताना भालेकर म्हणतात –

''तुमचाच भोवला ताप। भरले पाप। म्हणून फावले इंग्रजा।। म्हणती दयाळु राजा।।४१।।
व्यापारी गोरे शिपाई। बंडे ठाई ठाई। होती नाही घाबरले। शांतता करीत सांवरले''[३३] ।।४२।।

इंग्रज राजवट येण्याला आर्य लोक कारणीभूत आहेत, असे भालेकर ठामपणे सांगतात. म्हणून आर्यांना म्हणतात -

> ''घरच्यास घरी कोंडुनी। पुढे होऊन। तुम्ही काय करणार परक्यांशी।।
> द्यावी दृष्टी घरच्याशी''[३४]।।४३।।

असा विचार मनी करून दीन लोकांना 'बोधून विद्यामृत पाजा' असा मोलाचा उपदेश या पोवाड्यातून केला आहे.

**सारांश :**

पोवाडा हा मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील एक प्रकार आहे. पोवाडा म्हणजे वीरांच्या, पराक्रमांचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन होय. कृष्णराव भालेकरांनी कारागिरांची विपन्नावस्था व्यक्त करण्यासाठी पोवाड्यांचा वापर केला आहे. या पोवाड्यातून बहुजन समाजावर होणारा अन्याय समाजासमोर मांडला आहे.

कृष्णराव भालेकरांनी एकूण सात पोवाडे लिहीले आहेत. 'आमचे कारागीर', 'पूर्वीची व सांप्रतची स्थिती', 'कलगीतुरा', 'शिवशक्ती', द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणाऱ्यास विनंती', 'राघू गाडीवानाचा पोवाडा', 'लोकल फंडाचा पोवाडा', दक्षिणेमधील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ', 'अनार्यांचे गाऱ्हाणे' हे विषय पोवाड्यातून मांडले आहे. अज्ञानी जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी भालेकरांनी पोवाडे लिहिले आहेत. शेतकरी, कारागिर, मजूर यांच्या व्यथा, वेदना, दुःख या पोवाड्यांतून आले आहे. 'आमचे कारागीर' या पोवाड्यातून भारतीय व परदेशी कारागीर यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. यातून त्यांच्या दैन्यस्थितीचे वर्णन केले आहे. 'पूर्वीची व सांप्रतची स्थिती' या पोवाड्यातून इंग्रजी राजवटीच्या पूर्वीची व आगमनानंतरच्या स्थितीचे वर्णन केले आहे. पेशवाईच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत. 'कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती', या पोवाड्यातून निरर्थक बडबड बंद करण्यासाठी विनंती केली आहे. मोलमजुरी करणाऱ्या गाडीवानाची पोलिसांकडून कशी फरपट होते याचे फार

प्रभावी चित्रण भालेकरांनी 'राघू गाडीवाना'च्या पोवाड्यातून केले आहे. 'लोकल फंडा'च्या पोवाड्यातून तत्कालीन समाज स्थितीचे वर्णन केले आहे. शेतकऱ्यांकडून कोणकोणत्या मार्गाने कर वसूल केले जातात याचे चित्रण केले आहे. तर, 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाड्यातून दुष्काळाचे प्रलंयकारी चित्रण केले आहे. दुष्काळामुळे शेतकऱ्यांची झालेली वाताहत याची कारणे सांगितली आहे. मानवी हक्कांचे मागणे मागण्यासाठी 'अनार्यांचे गाऱ्हाणे' हा पोवाडा लिहिला आहे. हे पोवाडे हृदयाला चटका लावणारे आहेत. बहुजन समाजास आपल्या दयनीय स्थितीची व अज्ञानाची जाणीव करून दिली आहे. समाजात नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण करणारे समाजनिष्ठ शाहीर म्हणून भालेकरांचा उल्लेख केला आहे. तत्कालीन दुष्काळावर कविता लिहिणारे भालेकर हे एकमेव कवी होते.

या पोवाड्यांची भाषा साधी, सोपी व सुबोध आहे. सामान्य माणूस श्रोता म्हणून डोळ्यासमोर ठेवून भालेकरांनी रचना केली आहे. त्यामुळे त्यांच्या पोवाड्यात जनसामान्याबद्दल जिव्हाळा, अपार माया, कारुण्य व आपुलकी या गुणांमुळे पोवाडा ओतप्रेत भरलेला आहे. त्याबरोबरच करुण रसाचा उत्कट आविष्कार केला आहे. उपदेश, सडेतोडपणा, प्रसादत्मकता ही भालेकरांच्या लेखनीचे वैशिष्ट्ये आहेत. शेतकरी, कष्टकरी, मजूर यांची दु:खे अतिशय समर्पकपणे मांडली आहेत. त्यामुळे या पोवाड्यांना वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले आहे. पोवाड्याचे निवेदन प्रवाही आहे. येथे अलंकारिक भाषेचा वापर केला नाही. याबरोबरच बहुजन समाजाची अगतिकता, प्रकोप, आवेश, आक्रमकता, प्रचारकीपणा, तळागाळातील वर्गाच्या मानवी संवेदना, त्यांच्या जीवनाचा सखोल आशय ही पोवाड्यांची वैशिष्ट्ये होत.

**हितोपदेश :-**

'अभंग' हा प्राचीन साहित्यातील रचना प्रकार आहे. तेराव्या शतकात मराठी वारकरी संतांनी रुढ केलेला छंद आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अभंगाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञानदेवांपासून तुकारामापर्यंत अनेक मराठी संतकवींनी आपल्या अभिव्यक्तीसाठी

अभंगाचे माध्यम वापरले आहे. संतांनी आपल्या अभंगातून परमार्थानुभव व्यक्त केला आहे. 'अभंग' म्हणजे कधीही भंग न पावणारा. अशा अभंगाची व्याख्या केली जाते, तर आधुनिक काळामध्ये महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, पंडित धोंडिराम, मुकुंदराव पाटील यांनी अभंग लिहिले आहेत.

कृष्णराव भालेकरांनी इ. स. १८७६ साली 'हितोपदेश' नावाचे भजनी अभंगातून आगळी-वेगळी रचना केली आहे. अज्ञानी समाजासाठी लोकशिक्षणाचे दालन खुले केले आहे. समाजामध्ये जागृती करण्यासाठी सुबोध भजनाची रचना केली आहे. एकूण सोळा अभंग व पाच हिंदी पदे आहेत. या अभंगातून शूद्रांच्यावर होणारे अन्याय, धार्मिक-आर्थिक शोषण, सामाजिक विषमता, जातिभेद, दैव, देवभोळेपणा, अज्ञान, निरक्षरता या परिणामांना सामोरे जाण्यासाठी भालेकरांनी विद्येची महती पटवून दिली आहे. अशी शोषणावर हल्ला चढविणारी अभंग रचना केली आहे. पाटील-कुलकर्णी, शेटजी-भटजी, सावकार-सरकार हे विषय त्यांच्या कवितेचे आहेत. शेतामध्ये दिवसभर काबाडकष्ट करून रात्री फावल्या वेळात शेतकरी परमेश्वराचे गुणगान करण्यासाठी एकत्र येत असतो. या एकत्र जमलेल्या शेतकऱ्यांना परमेश्वराचे गुणगान गाता गाता स्वत:चेही जीवनमान गाता यावे हे त्यामागचे प्रयोजन आहे.[३५] भालेकरांनी या अभंगातून परमेश्वराची स्तुती केली नाही तर तत्कालीन शेतकरी जीवनाच्या सत्यस्थितीचे वर्णन केले आहे. शेतकऱ्यांचे हित कशात आहे हे 'हितोपदेश'मधून भालेकरांनी सांगितले आहे.

### १) शूद्रस्थिती :

प्रस्तुतच्या अभंगातून भालेकरांनी शूद्रांच्या दु:खाची कारणे सांगितली आहेत. भालेकर म्हणतात - शूद्रांचे दु:ख वन हे असून त्यात अवगुणांचे खडे व काटे भरलेले आहेत. याचे पहिले कारण विद्याहीनत्व, दुसरे मद्यपान, तिसरे आळस ही कारणे सांगितली आहते. शूद्र लोक मनात भीती बाळगून जीवन जगत असतात. त्यामुळे त्यांना -

> ''भ्रम नीती कळेना ।
>
> न ये करिता दानधर्म। नेमकर्म तैसेचि।।

अंधळे, पांगळे, मुके। लुले भुके ऐशा दान''[३६] ।।४४ ।।

विद्या नसल्यामुळे हे लोक अपंग झाले आहेत म्हणून भालेकरांनी 'उद्योग' व 'विद्या' शिका उपदेश केला आहे.

शूद्रांच्या हितासाठी लिहिलेल्या 'हितोपदेशा'मधून शेतकरी बारा महिने शेतात राबतात तरीही त्यांच्या पोटाला अन्नपाणी मिळत नाही. यांच्या नशिबाला अठरा विश्वे दारिद्र्य आहेत. खूप कष्ट करूनही जीवाला विश्रांती मिळत नाही. 'निर्जीव कांती, नित्य चिंती' यामुळे शेतकऱ्यांच्या वाट्याला दु:खच येत असे. अशातच 'धुर्तांनी मांडिला कहर, ठकविले भोळ्या फार', वडिलांचे श्राद्ध आले म्हणून त्यांना भय घालून त्यांच्याकडून दक्षिणा उकळली जात असे. धर्माच्या नावाखाली त्यांना लुटले जात असे. त्यामुळे -

''अज्ञानाचे अगर शूद्र । दु:खाचे सागर । दारिद्र्याचे नगर। शूद्रकष्टी सर्वस्वी ।।४५ ।।

नांगरापाठी पळे। शूद्रा अंगा वस्त्र न मिळे। उन्हामध्ये तळमळे शूद्र''[३६] ।।४६ ।।

सतत उन्हांमध्ये कष्ट करणाऱ्या शूद्रांना सुखसोहळ कोठून मिळणार? अशा या भोळ्या शूद्रांना धुर्तांनी भुरळ घातली आहे. म्हणून त्यांना चटणीचे गोळे खावे लागतात. आळशी भट मात्र शूद्रांच्या जीवावर मजा मारतात. ही शेतकऱ्यांची स्थिती पाहून भालेकरांचे मन हळहळले आहे. या अभंगातून कष्टकरी बहुजनांविषयी अपार करुणा, आपलेपणा व जिव्हाळा दिसून येते.

**२) भिक्षुक शाहीवर हल्ला :**

भटजी लोक शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना लुबाडतात. हे भालेकरांनी 'हितोपदेश'मधील अभंगातून सांगितले आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर जगणारी भिक्षुक मंडळी भिक्षा मागत फिरतात. हे शूद्र लोक पुण्याच्या नावाखाली दक्षिणा देतात. या शूद्रांच्या अज्ञानी, भोळेपणा याचा गैरफायदा घेऊन शूद्रांच्या घरी बारावा, बारसे असो धर्माच्या नावाखाली त्यांच्याकडे रोकडे दान घेतात. शूद्रांना यमाची भीती घालून त्यांच्याकडून दक्षिणा उकळत असत. अशाप्रकारे पुरोहित वर्गाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या सर्व गोष्टींमागे त्यांचे मतलबी अर्थकारण आहे. हे भालेकरांनी आपल्या भाषेतून परखडपणे व

निर्भयपणे स्पष्ट केले आहे. 'ऐदी', 'निर्लज्ज', 'धूर्त', 'महाकपटी' ही विशेषणे वापरून भटजीचा चांगलाच समाचार घेतला आहे. 'किती एक भट वर्तती, मद्य प्राशीती मांस भक्षिती, नित्यकाळी हो किती एक।।धृ.।। ४७।। व्यभिचारी घातकी मोठे, चोऱ्या कागद खोटे। चोऱ्या, करूनी पोटे, भरती लोटे, सोडुनी भिती हो''[३८] ।।४८।।

या भटांच्या आचरण, वर्तन, राहणीमान यावर भालेकरांनी कठोर प्रहार केला आहे. या अभंगातून भटजीबावाला जाब विचारला आहे की, ''सहज विचारणे विचारतो ब्राम्हणा, अज्ञानत्व शूद्रा याचे कारण'' तुम्हाला पशुच्या स्पर्शाने विटाळ होतो यासाठी भालेकर प्रश्न विचारतात.

''भटजीबाबा ऐका एक । मनी करावा विवेक ।।४९।।
तुमचे तुम्हा विचारितो । शूद्र प्रश्न मी करितो ।।५०।।
तुम्हापेक्षा आम्हां उणे । काय सांगा आहे गुणे ''[३९]।।५१।।

हे शूद्र लोक वस्त्र, भांडी, गहाण ठेऊन भटजीचा मान राखून त्यांची सेवा करतात. तरीसुद्धा हे भटजीलोक विद्याहीन शूद्रांना पशुसमान वागणूक देत असतात. त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेणारे द्रव्यलोभी ऐतखाऊ ब्राम्हण यांच्याविषयीची चीड पोटतिडकीने व्यक्त केली आहे. या रचनेतून आक्रमकपणा दिसून येतो. भालेकरांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे भटांनी टाळले आहे. म्हणून भालेकर म्हणतात 'शूद्रा ठकविले, शूद्रा ठकविले' अशी त्यांनी गर्जना केली आहे. या भोळ्या भाबड्या शूद्रांना फसविण्याचा सपाटा चालविला आहे. म्हणून 'कळला आम्हा बककावा' असे ते निक्षून सांगतात.

अज्ञानी समाजाला जागृत करण्यासाठी भटभिक्षुकांनी आपल्या जाळ्यात पकडले आहे. हा बामणी कावा भालेकर पूर्णपणे ओळखून होते. म्हणून ते शूद्रांना कळवळून सांगतात की, 'विद्या शिका,' त्या दुष्ट ठकांना फसू नका.

''असे तसे नव्हे बाबा ते दुकान, दृश्य देऊन अदृश्य होण्याचे ठिकाण।।५२।।
रोख दक्षिणा द्यावी घ्यावे पुण्य उधार, ग्रंथी प्रमाण दिले पहा स्वार्थी आधार''[४०] ।।५३।।

अशी शब्दरचना करून कर्मकांड, स्वार्थ, दंभ, ढोंग या गोष्टी निदर्शनास आणल्या आहेत. 'सोंग बकाचे' घेऊन -

भट हे श्रीमंत असूनही धर्माच्या नावाखाली गरीब असल्याचा आव आणतात. खोट्या कारणांसाठी शूद्रांना फसवून फुकट खातात. आयते खाण्यासाठी ही मंडळी सोकावलेली आहेत. म्हणून भालेकर परखड भाषा वापरतात. येथे भटाची व्यक्तिरेखा रेखाटली आहे. गोड बोलून फसवणाऱ्या या भटजीला भालेकरांनी 'बगळे' शब्द वापरला आहे. भालेकरांनी आपल्या काव्यलेखनामध्ये बहुजन समाजस्थितीचे वर्णन केले आहे.

**३) विद्येची महती :**

भालेकरांनी 'साधू कैसा ओळखावा' यामधून खऱ्या साधूचे गुण व्यक्त केले आहे. अज्ञानी, अशिक्षित शूद्रांची मुक्तता करण्यासाठी 'विद्या शिका' असा मोलाचा उपदेश केला आहे. सर्वांनी विद्या घेतली तर ठकांच्या जाचातून मुक्त व्हाल असे भालेकरांनी बजावून सांगितले आहे. विद्या घेणारा "सर्वात श्रेष्ठ विद्याकांत" असतो. सतत कष्ट करुनही शूद्र आपल्या दु:खाला सुख मानत असतात व जीवन जगत असतात. यांना तहानभूक, रात्रंदिवस, सगळे ऋतू सर्व समान असते. गहू, नाचणी असली तरी तूप, गुळवणी असली तरी त्यांना फरक पडत नाही. झोपण्यासाठी गादी काय नि घोंगडी यांचे काही शुभ ना अशुभ या गोष्टींची जाणीव होण्यासाठी भालेकर विचारतात - "सांगा कोण दिसे यजमान काय दात्याची खुण" या गोष्टीचा 'अज्ञान' हा घटक कारणीभूत ठरला आहे. यासाठी भालेकरांनी विद्येचे महत्व पटवून दिले आहे.

"विद्या सर्व सुखांचे वस्त्र । विद्या महातेजाचे शस्त्र

विद्या शक्ती करवी शास्त्र । विद्येची विद्या"[४१] ।।५५।।

विद्यारुपी शक्तीमुळे शास्त्र तयार होते. विद्येमुळे जगाचे कल्याण होते. व्यक्ती योगी बनू शकतात. विद्या, पाप, पुण्य या गोष्टींचा सर्वनाश करते. सर्व गुणांची प्राप्ती होते. विद्येमुळे संरक्षण मिळते. विद्या निर्गुण - सगुण, सद्गुण - अवगुण हे सर्व जाणत असते. म्हणून विद्या ही 'रत्नहिऱ्यांची खाण' आहे. गेय, साधी, सोपी तसेच शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन करणारी

भालेकरांची उत्कृष्ट अशी अभंगरचना आहे. भटजीच्या शोषणाला आळा घालण्यासाठी व बहुजन समाजाचा स्वाभिमान जागा करण्यासाठी विद्या सर्व सुखांचे वस्त्र हे पटवून दिले आहे.

**४) मानवी हक्कांची जाणीव :**

विद्येचे महत्त्व पटवून दिल्यानंतर भालेकर परमेश्वराला विनवणी करतात. देवा, आम्ही अज्ञानी, मतिमंद, विद्याहीन असल्यामुळे आम्ही विसरुन गेलो आहोत. या भटांनी आम्हांला अज्ञानात गुरफटून शूद्र बनविले आहे. हे तुझे तुच पाहूनं घे ''आम्हाकडे काही नाही, आम्ही मूढ पशुवत राही,''म्हणून आम्हाला अज्ञान, दारिद्रय, दु:ख यामध्येच जीवन कंठावे लागते. यामध्येच आमच्या 'असंख्य पिढ्या झाल्या खाक' -

''आम्हा नाही राजाश्रय, नाही विद्वज्जन साह्य, आम्हा नाही द्रव्य
संचय, मात्र अपाय धूर्तांचा । आमुचे आम्हा हक्का देववी''[४२] ।।५६ ।।

शूद्रातिशूद्रांच्या अवनतीचे मुख्य कारण अज्ञान आहे. ते दूर करण्यासाठी समाजात विद्येचा प्रसार केला पाहिजे. हे भालेकरांनी तळमळीने व कळकळीने सांगितले आहे.

बहुजन समाजाची सुधारणा घडवून आणणे या हेतूने अभंगाची रचना केली आहे. धर्माच्या नावाने शूद्रांना हे भट नाडतात, लुबाडतात व शोषण करतात याची जाणीव भालेकरांनी करून दिली आहे. ज्ञान व शिक्षणाचे महत्व पटवून दिले आहे. स्वार्थी, ढोंगी, मतलबी, वर्तनावर उपहासात्मक पद्धतीने कोरडे ओढले आहेत.

**हिंदी पदे -**

कृष्णराव भालेकरांनी 'हितोपदेश' अभंगामध्ये पाच हिंदी पदांचा समावेश केला आहे.

प्रस्तुतच्या पदातून अज्ञानी, अशिक्षित शूद्रांना शिक्षण नसल्यामुळे त्यांच्या दैन्य अवस्थेचे वर्णन केले आहे. भटभिक्षुक हे स्वत: ग्रंथ रचत असतात. त्यांचे ज्ञान हे केवळ पोटभरुचे आहे. त्यामुळे हे भटजी लोक शूद्रांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन धार्मिक व आर्थिक शोषण करतात -

"बहोत दिनसे चोरी कर कर नहीं मिलाथा ज्ञानांधा, आंग्रेज

उजेला करके छापडा विद्या रसीसे बांधा "[४३] ।।५७।।

इंग्रजांनी शिक्षणाची सोय केली पण याचा फायदा ब्राह्मणांनी उचलला. म्हणून भालेकर म्हणतात –

"तुम लोक पुराण जाने पेटकी बसती जी जी, बैठी जग्गो खाना

मिलना येही बंदोबस्ती जी"[४४] ।।५८।।

यासाठी भालेकरांनी बोली भाषा वापरली आहे. ती सर्व सामान्यांना समजेल अशा भाषेत आपले विचार मांडले आहेत. पदांची भाषा वापरली आहे. पदांची भाषा सोपी, साधी, सरळ आहे.

" अंधे, भुके, लुले, भुके, लंगडे, बहिरे, पिटे, धट्टे, कट्टे, लट्टे, भट्टे खाडे बनाये गिट्टे "[४५] ।।५९।।

सर्व अवयव असूनही विद्यारुपी अवयव नसल्यामुळे शूद्र हे पंगू आहेत. असे भालेकरांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते.

भटभिक्षुकांनी आपल्या हिताचे ग्रंथ रचून आपली पोटे भरण्यासाठी शूद्रांची फसवणूक केली हे सांगताना :

"शूद्र दुखया बम्मन किया, कबूल नहीं हुवावे तो –बी ।।६०।।

कहे किसनजी सुनो भटजी, आब तो छूयाय बे तो बी ।।६१।।[४६]

तुम्ही आम्हांला फसवू शकत नाही. हे भालेकरांनी हिंदी पदातून व्यक्त केले आहे. "रा. भालेकर व रावजी शिरोळे वगैरे भांबुर्डेकर मंडळीनी समाजाचे सत्य आणि स्तुत्य उपदेश ऐकुन सभासद झाले इतकेच नाही, पण त्यांनी भांबुर्डे ता. हवेली, जि. पुणे येथे समाजाची शाखा स्थापून लोकांना कविता म्हणजे अभंग व दिंड्या याद्वारे उपदेश करुन कित्येक गृहस्थांस सभासद केले. त्याच्या उत्तरोत्तर उत्कर्ष पावत आहे".[४७] अशा शब्दात भालेकरांनी अज्ञानी, अशिक्षित समाजासाठी लोकशिक्षणाचा प्रसार केल्याचा उल्लेख येतो.

**सारांश :**

प्राचीन साहित्यातील 'अभंग' हा प्रकार आहे. तेराव्या शतकात मराठी वारकरी संतानी रुढ केलेला छंद आहे. मराठी वाङमयाचा इतिहासात अभंगाला खूप महत्वाचे स्थान आहे. आधुनिक काळामध्ये कृष्णराव भालेकर यांनी 'हितोपदेश' नावाचे भजनी अभंग प्रसिद्ध केले. बहुजन समाजात जागृती करण्यासाठी सुबोध भजनाची रचना केली. भालेकरांनी एकूण सोळा अभंग व पाच हिंदी पदे लिहिले आहेत. तत्कालीन बहुजन समाजाबाबतची संवेदना भालेकरांनी 'हितोपदेश' भजनातून मांडली आहे. शेतकऱ्यांचे हित कशात आहे. हे यातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'पाटील – कुळकर्णी','शेटजी – भटजी', 'सावकार – सरकार' हे त्यांच्या कवितेचे विषय आहेत. शूद्रांच्या अवनतीचे मुख्य कारण 'अज्ञान' आहे. पुरोहित वर्ग हे शेतकरी, मजूर यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडतात. स्वत: भ्रष्टाचरण करुन विविध प्रकारचे शास्त्राधार शोधून काढतात व शेतकऱ्यांना त्रास देतात. याच्या कसबाला तोंड द्यायचे असेल तर 'विद्या' व 'उद्योग' या दोन शस्त्राच्या साहाय्याने देता येईल, हे सांगून भालेकरांनी शेतकऱ्यांच्या दैन्य, दु:खाची कारणमीमांसा केली आहे. शेतकऱ्यांचे वास्तव जीवन चित्रीत केले आहे.

अभंगाची भाषा साधी, सरळ व समजण्यास सोपी आहे. 'देशी' रचनाबंधचा वापर करुन भालेकरांनी अभंग लिहिले आहे. संतांनी पारमार्थिक विचार मांडले. तर भालेकरांनी सामाजिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अभंगांचा वापर केला आहे. बहुजन समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी समाजातील दंभ, ढोंगावर कोरडे ओढले आहेत. भालेकरांनी निवडलेला हा प्रकार प्राचीन साहित्यातील काव्यप्रकार असला तरी, त्याचा आशय मात्र आधुनिक आहे. शूद्रांच्या दु:खस्थितीची कारणे सांगितली आहेत. पुरोहित वर्गाची चलाखी यजमान, पुरोहित यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. या पुरोहितांनी स्वत:च्या हिताची ग्रंथरचना करून शूद्रांना ठकविले आहे. या ग्रंथातून परमेश्वर विषयक अज्ञान, अंधश्रद्धा व समाजातील वर्णव्यवस्था याविरुद्ध तत्वज्ञान भरुन लोकांना अज्ञानी पिंजऱ्यात बंद करुन ठेवले आहे. शेतकऱ्यांच्या दैन्य दु:खाची कारणमीमांसा भालेकरांनी केली आहे.

**शेतकऱ्यांचे मधुर गायन**

कृष्णराव भालेकरांनी 'शेतकऱ्यांचे मधुर गायन' केले आहे. शेतकऱ्यांच्या विकासाच्या मार्गात येणाऱ्या अज्ञान, निरक्षरता, दास्य, दारिद्रय, दुःख इ. अडथळ्यातून शेतकऱ्यांची मुक्ती व्हावी. म्हणून भालेकरांनी अनेक उपाय, सूचना व बोध काव्याद्वारा व्यक्त केलेला आहे. या काव्यसंग्रहात भालेकरांनी 'ईशस्तवन' आणि 'नृपवंदन मध्ये ईश्वराला व राजाला प्रार्थना केली आहे. 'पाटीलकी,' 'शेतकऱ्यांची थोरवी,' 'धूर्तांचे म्हणणे,' 'शेतकऱ्याचे जिणे,' 'मुहूर्त,' 'खोट्या नादी लागू नका,' 'कुलकर्णी व तगाई,' 'मारवाडी,' 'खरा पाटील,' 'भटजी,' 'शेतकरी उठा,' 'शेतकरणी,' 'शेतकऱ्याची मुले,' ' शेतकरी वीर – अंगना,' 'नवीन पूजा', 'भट हाच शनि,' 'सोवळे', 'मोठे शेठ सावकार', 'शेतकऱ्यांची स्थिती,' 'शेतकरी व कारागीर हेच देशाचे खांब खंबीर,' 'शेतकऱ्यांच्या उपदेशासाठी आम्ही वाहिलो आहो' अशा काव्यातून तत्कालीन परिस्थितीचे वास्तव दर्शन घडविले आहे. यात एकूण ३२ पदे लिहली आहेत.

**१) ईशस्तवन व नृपवंदन :**

शेतकऱ्याच्या मधुर गायनाची सुरुवात भालेकरांनी 'ईशस्तवना'ने केली आहे. यामध्ये ईश्वर हा 'दीनवत्सल,' 'कृपासिंधू,' 'दीनदयाळा,' 'दीनबंधू,' 'दयाघना,' आहे. तो सर्वश्रेष्ठ असून शक्तिमान आहे. अशी विशेषणे वापरून –

> ''दीनजनांचे उपदेशाशी ।
> अर्पियले देह त्याशी । जगदीशा। परमेश ।
> म्हणुनी धावुनी । येऊनी । करी साह्य दावुनी, सत्य पंथा ।।
> दीनजनांच्या कैवाऱ्यांशी । करि ना देवा दीर्घायुषी''[४८] ।।६२ ।।

शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची सेवा करता यावी म्हणून भालेकरांनी ईश्वराला दीर्घ आयुष्याचे मागणे मागितले आहे.

ईशस्तवनानंतर 'नृपवंदन' या काव्यामध्ये आपल्या देशामध्ये 'देव' आणि गुरु' यांच्या खालोखाल 'राजाला महत्व प्राप्त झाले आहे.

"इच्छुक शांतता अहर्निशी । प्रार्थू भगवंताशी । सत्ता प्रभुची या देशी
व्हावी दीर्घायुष्यी"[४९] ।।६३।।

आपल्या देशामध्ये ज्ञान, सत्य, समता व मानवी हक्क याचे राज्य प्रस्थापित व्हावे अशी प्रार्थना भालेकरांनी केली आहे.

२) **पाटीलकी :**

'पाटीलकी' या कवितेमध्ये पाटीलकीचा इतिहास आला आहे. या कवितेत भालेकर म्हणतात –

" पाटील अमुचे मालक मुळचे गावाच्याही बहु आधीचे" ।।६४।।[५०] सुरुवातीला मानव जंगलात टोळ्या करुन दरी, डोंगरात राहत होता. त्याकाळी शस्त्रे, वस्त्रे याचे काही ज्ञान नव्हते. तेव्हा नवरा – बायको ही नाती नव्हती. भाषा नव्हती. जंगलामध्ये कंदमुळे, कच्चे मांस शोधून खात होते. काही दिवसांनी वतने निर्माण झाली. नंतर राज्ये उदयास आली. म्हणून या सर्वाआधी मूळ मालक पाटील आहे. असे भालेकर म्हणतात –

"शेतकऱ्यांची सर्वांआधी मूळ झोपडी
नगरे राजवाडे मूर्ती देवळे गाडी घोडी"[५१] ।।६५।।

शेतकऱ्यांच्या मनात भालेकरांविषयी जिव्हाळा, अपार करुणा व सहानुभूती ओतप्रेत भरलेली आहे.

पाटीलकरीबरोबर गावाला पाटील कसा असावा याचे वर्णन 'खरा पाटील' या कवितेतून भालेकरांनी यथार्थपणे केले आहे.

"पाटील कैसा गावी असावा। मायबाप तो रयतेला।
शुद्धाचरण सत्यभूषण मोठे। भूषण गावाला"[५२] ।।६६ ।।

या धृपदातून पाटलाचा गौरव केलेला आहे. शेटजी, भटजी, सावकार, सरकार हे शेतकऱ्यांचे धार्मिक व आर्थिक शोषण करतात. ही फसवणूक व पिळवणूक होऊ नये म्हणून गावाला खऱ्या पाटलाची गरज असते. या कवितेतून आदर्श पाटलाचे उदाहरण दिले आहे. हे भालेकरांनी साध्या, सोप्या, सरळ व सुबोध भाषेत मांडले आहे.

## ३) शेती व शेतकरी यांची गौरवपदे -

भालेकरांनी हिंदी पद्यरचना केली आहे. 'शेतकऱ्यांची थोरवी' या पदात -

> ''हम तो जमेदार लडके। नाम है अमीरोंसे बढके'' ।।६७।।[५३]

या शब्दांतच थोरवी गायिली आहे. पृथ्वी, आप, वायू, तेज, आकाश या पाच तत्त्वांशी शेतीचा निकटचा संबंध आहे. शेती हा उद्योग सर्व मानवी प्राण्यांचा पिता आणि खेड्यांची माता आहे. अशा शब्दांत शेती व शेतकऱ्यांचा गौरव केला आहे. शेतीमध्ये राबणारा शेतकरी केवळ झोपडीचाच मालक असून, 'सब जमीन मुलुख के खेतीवाले ढेरे है' या पंचतत्त्वावर शेती आधारीत आहे हे दिसून येते.

'शेतकऱ्यांच्या उपदेशासाठी आम्ही वाहिलो आहो'[५४] या काव्यातून शेतकरी बळीराजाचे वंशज आहेत. पण या शेतकऱ्यांना खूप कष्ट करूनही सुख मिळत नाही. त्यांच्या वाट्याला सदैव दुःखच असते. याशिवाय भट, भिक्षुक, सरकार, सावकार, पाटील, कुलकर्णी त्यांना लुबाडून त्यांचे आर्थिक शोषण करतात. त्यामुळे त्यांचे हाल पाहून 'व्यर्थ मरणे नको जगणे' म्हणून भालेकरांनी 'शेतकरी सेवक' हा शब्द वापरला आहे. यासाठी आम्ही शेतकऱ्यांची सेवा करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले आहे. यामध्ये एक वेगळाच आनंद असतो, असे मत भालेकरांनी व्यक्त केले आहे. शेतकऱ्यांचे जीवन किती कष्टप्रद आहे हे भालेकरांनी 'शेतकऱ्याचे जिणे' यातून स्पष्ट के ले आहे. शेतकऱ्याला किती त्रास सोसावा लागतो याचे वर्णन करताना -

> 'नाठाळ ओढाळ गुरे धरितो हातची सुटता मागेचि पळतो
> शिंगाने फाडी लाथेने पाडी। तरी पशूच्या मोडितो खोडी'' ।।६८।।[५५]

कोल्हे, तरस, लांडगे, विंचू दंश करतात तरीसुद्धा ते घाबरत नाही. भालेकरांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन शेतकऱ्याविषयीचे दैनंदिन कष्टाचे जीवन रेखाटले आहे.

भालेकरांनी 'शेतकऱ्यांची मुले', 'शेतकरी वीर-अंगणा', 'शेतकरी' व शेतकरणी यांचा गौरव केला आहे. शिळ्या शिदोरीवर ताव मारून शेतात औतकाठी गुरे वळवण्यासाठी

कामे करतात. गुरांबरोबर त्यांना झाडी, पहाडी, दरी-डोंगरातून पळण्याची कसरत करावी लागते. अशी ही मुले कष्टाची कामे करतात.

'शेतकरी', 'शेतकऱ्यांची मुले' याबरोबरच 'शेतकरी वीर - अंगना', 'शेतकरणी' यांनासुद्धा तितकेच महत्त्व दिले आहे. वेळप्रसंगी त्या रणांगणावर लढण्यास सुद्धा तयार असतात-

''आम्हा अबलांच्या शुद्ध दुधाने । भावी प्रजेची जोपना।।६९ ।।

आमची शक्ती शक्ती प्रजेची। नका म्हणू मनोरंजना''[५६] ।।७० ।।

अशा शब्दांत शेतकरी वीर-अंगणाचे महत्त्व पटवून दिले आहे. या शेतकरींना 'देऊनी तारा ज्ञानशक्ती अज्ञान हीच वैतरणी हो ' शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांना विद्या दिली तर - ''विद्याभूषित विद्वज्जनाला कशा शोभाव्या ह्या भगिनी हो'' असे वर्णन 'शेतकरणी' या कवितेतून केला आहे. दु:ख, दैन्य, शोषण, वेदना या गोष्टींना न डगमगता कोणत्याही प्रसंगांना त्या यशस्वीपणे तोंड देतात. म्हणून भालेकरांनी 'शेतकरी', 'शेतकऱ्यांची मुले', 'शेतकरी वीर-अंगना', 'शेतकरणी' यांचे कौतुक केले आहे. येथे भालेकरांचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते.

भालेकरांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन शेतकऱ्यांच्या दु:स्थितीवर प्रकाश टाकण्याचे कार्य केले आहे. शेतकऱ्यांचे दीनवाणे जीवन बघून 'शेतकरी उठा' या कवितेतून शेतकऱ्यांना विद्येचे महत्त्व पटवून देताना भालेकर म्हणतात -

''विद्या शिकुनि जागे व्हा हे। तिसरा डोळा उघडुनि पहा हो ''[५७]।।७१ ।।

या कवितेतून त्यांनी धर्मगुरू, सावकार यांना जाब विचारला आहे. 'घेता काय देता काय' अशी कडक शब्दांत सुनावणी केली आहे. 'तिसरे बोलू सुधारकांना चांगले सांगा या दोघांना' असे म्हणून भालेकरांनी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी विद्येची महती सांगितली आहे. 'हेच सांगणे' या कवितेतून शेतकऱ्यांनी समर्थ, सूज्ञ जनांशी मागणे मागितले आहे.

''आम्हामध्ये सतत फिरा उपदेश करा हेच सांगणे'' ।।७२ ।।[५८]

यासाठी आम्हाला साह्य करून 'ओळख पटवा धूर्तांची' निर्दय, निष्ठूर, लोभी, जुलमी, आळशी, दुष्टांची आम्हाला ओळख पटवून द्या. 'विद्यामृत गोडी कैसी प्रथम आम्हाला ती चाखवा'' या धूर्तांच्या मुळे आम्हांला खूप त्रास सहन करावा लागला आहे. आता तरी आम्हांला तुमचे म्हणून घ्या. यातून भालेकरांनी शेतकऱ्यांची केविलवाणी अवस्था व्यक्त केली आहे. यासाठी भालेकर म्हणतात -

''शेतकरी आणि कारागीर। हेच देशाचे खांब खंबीर
ऐसे असोनिया महावीर। झाली दशा निघेना हो धीर''[५९]।।७३।।

'शेतकरी यजमान'मध्ये शेतकरी शेतीचा मूळ मालक असून त्याला धान्य पिकवून सुद्धा वेळेवर खायला मिळत नाही. कापूस पिकवून अंगाला वस्त्र मिळत नाही. शेतकऱ्यांची ८० कोटी शेतसारा देण्यातच सर्व शक्ती संपते. पूर्वीपासून शेतकरी विद्याहीन असल्यामुळे २० कोटी मानवप्राणी पशुसमान आहेत असे वर्णन भालेकरांनी केले आहे. याची शेतकऱ्यांना जाणीव करून दिली आहे. भालेकरांनी शेतकरी हे 'प्राणांचेही प्राण' असा उल्लेख केला आहे. म्हणून 'उपदेशाचा फंद' या कवितेतून भालेकरांनी म्हटले आहे -

''धूर्त लोभी क्रूर यांनी केले जरि मतिमंद'' ।।७४।।[६०]

तरीसुद्धा शेतकऱ्यांना पाहून आनंद होतो म्हणून ''हा आनंद व्यक्त करताना म्हणे भालेकर शेतकऱ्यांचा सुसंग ब्रह्मानंद'' असा उल्लेख येतो.

भालेकर हे शेतकऱ्यांच्या जयघोषात गुंग झाले आहेत. हे 'शेतकऱ्यांवर दंग' या कवितेतून दिसून येते.[६१] 'शेतकऱ्यांची स्थिती' मधून शेतकऱ्यांचे राहणीमान हे साधू पुरुषांसारखे असते. भल्या पहाटे उठून तो गुरांना सोडून शेतात चरायला नेतो. रात्रंदिवस काबाडकष्ट करूनही त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होत नाही. त्याचबरोबर हे कुलकर्णी, मारवाडी, सावकार, सरकार, पाटील हे शेतकऱ्यांना लुटत असतात. त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना कंगाल केले आहे. याविषयी भालेकर म्हणतात -

''अडाणी शेतकरी आंधळे सहज बसती भोळे करा त्वरा जागे होण्याची''[६२]।।७५।।

वरील सर्व गोष्टींचा विचार करता 'आपण पाहू'[६३] कवितेतून शेतकऱ्यांच्या स्थितीचे गांभीर्य पटवून देताना भालेकर उदाहरण देतात. ''म्हणूनच नका लहान चुका होतो, त्यांचा पुढे खिळा'' या कवितेतून बहुजन समाजाविषयी विशेषत: शेतकऱ्यांविषयी अपार माया, उत्कटता व हृदयस्पर्शीपणा यामुळे त्यांच्या काव्याला अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

या कवितेमधून शेतकऱ्यांना अनेक संकटांशी झुंज द्यावी लागते. त्यांचे दु:ख, दैन्य, शोषण, वेदना यांचे वर्णन भालेकरांनी केले आहे. याबरोबरच शेतकऱ्यांना शेटजी, भटजी यांनीसुद्धा त्रास दिला आहे. हे आपल्याला 'धूर्तांचे म्हणणे', 'भिक्षुक आणि यजमान', 'मुहूर्त' 'खोट्या नादी लागू नका', 'मारवाडी', 'भटजी', 'पुजाऱ्या दुकान की तीर्थ?', 'सोवळे', 'भट हाच शनि' या कवितेतून स्पष्ट होते.

'धूर्तांचे म्हणणे' या कवितेतून शेतकरी भल्या पहाटे उठून बैल सोडून शेतात चारण्यासाठी नेतो. अंगाला पुरेसे वस्त्र मिळत नाही. पायाला चप्पल नाही. थंडी, वारा, पाऊस, उन्हातान्हातून फिरत असतो. रात्रंदिवस कष्ट करूनही त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण होत नाही. ओझी वाहून त्यांची मान, कंबर मोडलेली असते. असा शेतकऱ्यांचा दिनक्रम असतो. आणि –

''आळशी ठोंब्या भटा भिक्षुका कष्ट करूनि पोशितो
म्हणे भालेकर धूर्तची आळशी कष्टकऱ्या लुटतो'' ।।७६ ।।[६४]

या कवितेतून समाजाचे विसंगतीचे चित्र स्पष्ट केले आहे. त्याची स्थिती दारुण व केविलवाणी आहे. या कवितेतून अनेक संकटे सोसून शत्रू पक्षाचा उपहास, उपरोध, निंदा, छळ सहन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हलाखीचे वर्णन केले आहे.

भालेकरांनी 'भिक्षुक आणि यजमान' या कवितेतून भिक्षुक आणि यजमान यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. शेतामध्ये दिवसभर राबूनही –

''यजमानाला शिळी भाकरी कांदा मिरची एक ।
भिक्षुकाची नरम पोळी तुप वरी साजूक''[६५]।।७७ ।।

अशाप्रकारे भालेकरांनी यजमान व भिक्षुक यांच्या राहणीमानाची तुलना केली आहे. 'मुहूर्त' या कवितेत भालेकरांनी मुहूर्त पाहून कामे करण्याने कोणते परिणाम झाले हे सांगितले आहेत. राज्याभिषेकाचा मुहूर्त पाहूनही रामाचा वनवास टळला नाही, पांडवांनाही राज्य सोडून वनवासी जावे लागले. मुहूर्त पाहून शिवाजी महाराज गादीवर बसले तरी त्यांचे वंशज पुढे पेशव्यांना फसले. शास्त्री पंडित मुहूर्त पाहतात तरीसुद्धा मुली विधवा होतात, मुहूर्त वा भविष्य सांगूनसुद्धा हे अनर्थ ओढवतात. याच्यामागे भटजींचे स्वार्थी, मतलबी, हेतू स्पष्ट केले आहेत. शेतकऱ्यांना लुटणारा दुसरा कोणी नसून 'भट हाच शनि' हा भटच शेतकऱ्यांच्या हात धुऊन मागे लागलेला असतो. म्हणून भालेकरांनी स्पष्ट शब्दांत सुनावले आहे की,

खोट्याच्या नादी लागू नका, 'खोटा गुरु हा लटका भटजी नादी अशांच्या लागू नका' या कवितेमध्ये डौलासाठी बुडू नका, सत्य बोला, त्याचे आचरण करा, खोटा धर्म, पक्ष, पंथ जोडू नका, खोटा आशिर्वाद घेऊ नका, खोट्या धर्मगुरुस लगाम अडकवून नाचू नका.'

"नाना देव नाना तिर्थे नानाव्रते बहकू नका" [६६]।।७८ ।।

प्रस्तुतच्या कवितेतून 'भटजी हे धार्मिक विधी, व्रत, वैकल्य-पूजा, श्राद्ध यांच्या नावाखाली पैसे उकळत असतात आणि वरून मिष्ठान्नावर ताव मारतात यासाठी भालेकर म्हणतात -

"लाज तुला नाही भटजी लाज तुला नाही ।।धृ. ।।

दुबळ्यापाशी भीक मागुनी, तुप लाडू खाई" ।।७९ ।।[६७]

स्वतःच्या अंगावर सोने, मोती घालून वर भिक्षुकीचे सोंग घेऊन गरीब शेतकऱ्यांकडून दक्षिणा घेऊन लुबाडत असतात. स्वर्गातील आई-वडिलांच्या श्राद्धांच्या नावाखाली त्यांच्याकडून दक्षिणा उकळत असत. यातून भटजी अडाणी जनतेला कसे लुबाडतात, त्यांचे दर्शन 'नवीन पूजा' या कवितेतून घडविले आहे.[६८] यातून भालेकरांनी भटजीच्या कूट कारस्थानाला फसू नका, असा संदेश दिला आहे. या निमित्ताने 'पुजाऱ्या

दुकान की तीर्थ?' या कवितेतून भालेकर भटजीला जाब विचारतात.[६९] देवाच्या नावाखाली भटजी शेतकऱ्यांकडून पैसे घेत असतो. त्या मोबदल्यात तीर्थ देतो हा प्रकार म्हणजे शेटजींनी थाटलेल्या दुकानासारखा आहे. शेटजी माल देऊन पैसे घेतो तसा पुजारी दक्षिणा घेऊन तीर्थ देतो. यावरून अडाणी, शूद्र कसा नाडला जातो हे भालेकरांनी स्पष्ट शब्दांत व्यक्त केले आहे.

''धूतलेले फेडूनी वस्त्रे शिळे सोवळे नेसता।

का हो नेसता अमंगळ ते उवाही डसता ''[७०]।।८०।।

'सोवळे' या कवितेतून भालेकरांनी भटांच्या सोवळ्या ओवळ्याच्या कल्पनेतील फोलपणा स्पष्ट केला आहे. देवाची पूजा करण्यासाठी हे भट सोवळे नेसतात. एकच सोवळे वापरून त्याच सोवळ्याने नाक पुसतात. म्हणून भालेकरांनी स्वार्थी, ढोंगी, मतलबी वर्तनावर टीकात्मक, उपहासात्मक, व्यंगात्मक आणि विनोदी पद्धतीने ताशेरे ओढले आहेत.

**'मारवाडी' –**

गावातील भटजीप्रमाणे 'मारवाडी' चित्रित केला आहे. गोड बोलून शेतकऱ्यांना कसे फसवितो यांचे सुंदर वर्णन भालेकरांनी केले आहे.

''लहान खेडे पाहुनि टेकी बिऱ्हाड त्यात।

धीर धुर्तता। हेचि भांडवल जवळ नसते कवडी।

घर कशाचे दार कशाचे बिऱ्हाड असते चावडी।।८१।।

यांचे पीठ त्यांचे मीठ भाजी गोळा रोटी।।''[७१]

याचे चार, तर त्याचे पाच असे उसने घेऊन हिंग जिऱ्याचे दुकान थाटले आहे. याचे पहिले गिऱ्हाईक साध्या भोळ्या भाबड्या बायका असतात. ''पायली अधोली दाणे देउनि गरम मसाला घ्याया'' अगोदर कवडीही नसलेला मारवाडी शेतकऱ्यांच्या जीवावर श्रीमंत होतो. याचे वास्तव चित्रण रेखाटले आहे. येथे भालेकरांच्या दैनंदिन जीवनातील व्यवहारीपणा, सूक्ष्म निरीक्षण शक्ती दिसून येते.

**'कुलकर्णी' व 'तगाई'**

'कुलकर्णी'व 'तगाई' या कवितेतील कुलकर्णी खेडेगावातील लेखणीचा प्रमुख धनी असतो. यामुळे लेखणीचे सर्व व्यवहार हे कुलकर्णी पाहात असतो. सरकारकडून शेतकऱ्यांच्या हातात तगाईची संपूर्ण रक्कम कधी मिळत नाही. कारण त्या अगोदरच कुलकर्णी पैसे खातो? याचे जिवंत चित्रण केले आहे. शेतकऱ्याला सरकारकडून बाराशे रुपयांची तगाई मंजूर होते. या बाराशे रुपयात काही रक्कम कमिशन घेण्यासाठी कारकून, पट्टेवाले तयार असतात. पण कुलकर्ण्यांचे 'दीडशे रुपये' कमिशन दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या जवळ बाराशे रुपयातील दहाशे रुपये राहिले. बाकीचे दोनशे रुपये कधी मिळणार असे शेतकऱ्याने विचारल्यानंतर –

> ''कुळकर्णी मग रागावला शिव्याच देऊ लागला ।।
> बाकी रुपये मेल्यावरती मिळतील स्वर्गी खायला ''[७२]।।८२ ।।

वर सर्व रक्कम मिळाली म्हणून कुलकर्णी पावती देतो. एखादाच शेतकरी कलेक्टरकडे जाऊन दाद मागण्याचा प्रयत्न करीत असतो. शेतकऱ्यावर होणाऱ्या जुलमी अन्यायाचे चित्रण हुबेहूब रेखाटले आहे. शेतकऱ्यांचे भीषण दारिद्र्य व कुलकर्ण्यांची लबाडी भालेकरांनी निदर्शनास आणली आहे.

**'शेटजी'**

भटजी, मारवाडी, कुलकर्णी या प्रमाणेच 'मोठे शेठ सावकार' या कवितेतून सावकार शेतकऱ्यांना कर्ज देतो. या कर्जाचे व्याजावर व्याज चढवून शेतकऱ्यांचे घरदार, जमीन गहाण ठेवून शेतकऱ्याला देशोधडीला लावतो. त्यांच्या घरावरून नांगर फिरवितो. भालेकरांना ही गोष्ट असामाजिक, अमानुष वाटते. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या जीवावर हे सावकार 'मोठे शेठ सावकार' होऊन ऐषआरामात जगत असतात. याचे मार्मिक उदाहरण दिले आहे.

सावकार लोक भोळ्या, अडाणी लोकांकडून युक्तीने धन काढून घेतात व त्यांच्या जीवावर हवेली, गाद्या, गिर्ध्या, लोड घेऊन मजा मारत असतात. तूप, लाडू, खिचडी खात असतात तर भोळा मात्र –

"भूस कोंडा भोळ्या ठेवून अस्सल नेल्याचा ।।८३ ।।

शेटजीच्या पहा स्त्रिया सोन्या मोत्यांत ।

भोळ्याच्या बायकोपाशी काटा नाकात"[७३]।।८४ ।।

शेतकऱ्यांना हालअपेष्टा, श्रम, कष्ट एवढे सोसूनही त्यांच्या नशिबी दु:खच असते. तसे शेटजी, ऐश्वर्य, चैनविलास, ऐष आरामात जीवन जगत असतात. या विसंगतीतून शेतकरी आणि शेटजी यांच्या जीवनातील तफावतीचे प्रत्ययकारी चित्रण भालेकरांनी स्पष्ट केले आहे.

**शंकराचार्य –**

कृष्णराव भालेकरांनी 'शंकराचार्य' कवितेतून शंकराचार्याला जाब विचारला आहे. 'शंकराचार्य' हे हिंदूंचे 'धर्मगुरु' आहेत म्हणून –

"हिंदूंची माया । कशी नये तुजला। आम्ही हिंदु म्हणोनी

जगद्‌गुरु साजला"[७४]।।८५ ।।

आम्ही हिंदू म्हणून तुला आमच्याबद्दल चिंता वाटत नाही. तुम्हाला आम्ही गुरु का म्हणावे? तुम्ही आमच्यासाठी काय केले म्हणून भालेकरांनी खडसावले आहे. "हजारो लाखो खेड्यापाड्यातील शेतीत राबणाऱ्या उत्पादक व उपयुक्त बहुसंख्य वर्गाची अक्षरशत्रू अज्ञानी अवस्था त्यांच्या उणिवा व तक्रारी गाऱ्हाणी त्यांची पिळवणूक यांचे यथातथ्य जिवंत चित्र फुले यांचे सहकारी कृ. पा. भालेकर यांनी आपल्या पद्यातून उमटले आहे.[७५] या काव्याचा भालेकरांनी ठिकठिकाणी प्रसार केला.

**सारांश :–**

'शेतकऱ्यांचे मधुर गायन' ही कृष्णराव भालेकरांची अतिशय हृदयस्पर्शी काव्यरचना आहे. या काव्यरचनेतून शेतकरी जीवनाचा सर्वांगीण विचार व्यक्त झाला आहे. शेतकऱ्यांचे कष्टप्रद जिणे, रात्रंदिवस शेतात राबणे, त्यांची पिळवणूक व लुबाडणूक, त्यांचे शोषण करणारे घटक या उलट शेटजी, भटजी, कुलकर्णी यांचे जीवन याविषयी भालेकरांनी आपला दृष्टिकोन अत्यंत साध्या, सोप्या शब्दांत मांडला आहे.

'शेतकरी' या देशाचे मूळ मालक, बळीरायांचे वंशज आहेत. त्यांना अतिशय कष्ट करूनी सुख लाभत नाही. धूर्त भटभिक्षुक शेतकऱ्यांना आळशी म्हणतो पहाटे अंगावर पुरेसे वस्त्र नसतानाही शेतकऱ्याला कष्ट करावे लागते. ओझी वहावी लागतात. स्वत: रात्रंदिवस कष्ट करून तो जगाला पोसतो. इतर मात्र धूर्त, ढोंगी भिक्षुक त्यांची फसवणूक करतो. शेतकरी, अडाणी, अज्ञानी, अशिक्षित असल्यामुळे याचाच गैरफायदा घेऊन त्याचे धार्मिक व आर्थिक, सामाजिक शोषण होते. याबरोबरच 'नाही विद्यापरि पुरुषाला। तेथे कैचि आम्हा अबलाला।। अशा शब्दांत शेतकऱ्यांची व्यथा व्यक्त केली आहे. भिक्षुक व यजमान यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. भिक्षुक हा शेतकऱ्याच्या जीवावर ऐष आरामात मजा मारत जगत असतो. 'खोटे गुरु', 'मुहूर्त', 'सोवळे' यांच्या कल्पनेतील फोलपणा स्पष्ट केला आहे. 'लांब रशी गोल लोटा घेऊनिया हातात' अशा शब्दांत मारवाड्याचे वर्णन केले आहे. तर सावकार व्याजावर व्याज चढवून 'मोठे शेठ सावकार' झाले याचे चित्रण भालेकरांनी केले आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांचेही चित्रण भालेकरांनी केले आहे. शेतकऱ्यांना लुटारूंपासून सावध राहण्याचा उपदेश केला आहे. रात्रंदिवस कष्ट करूनही शेतकऱ्यांच्या त्यांच्या बायका मुलांचे हाल का होतात? या प्रश्नांची उत्तरे कवीने शोधली आहे. आणि तेच समाजासमोर मांडतो आहे. शेतकऱ्यांकडून भरमसाठ व्याज घेऊन त्यांचे शेत, घर घशात घालतो. अशाप्रकारे शेटजी, भटजी, कुलकर्णी यांची लबाडी भालेकरांनी जनतेसमोर मांडली आहे. यातून मुक्त होण्यासाठी विद्या शिकण्याचा 'मार्ग' सांगितला आहे. शेतकरी हा बहुजन समाजाचा कणा आहे. या बहुजन समाजाची दु:खे अपल्या काव्यातून वर्णिलेली आहेत. बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्याचे कार्य केले आहे.

'शेतकऱ्यांचे मधुर गायन' ही कविता अतिशय हृदयस्पर्शी आहे. खेड्यातील लोकांशी अगदी निकटचे नाते सांगणारी आहे. शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे निरीक्षण व वर्णन भालेकरांनी यथार्थपणे केले आहे. मोजक्या शब्दांत वर्णन केले आहे. यामध्ये स्पष्टपणा व निर्भिडता हे गुण स्पष्ट होतात.

**भालेकरकृत उपदेशपर लावण्या**

'लावणी' हा शाहिरी वाङ्‌मयातील दुसरा प्रकार आहे. पोवाडा हा रांगडा स्वरूपाचा, लावणी ही नाजूक आणि अटकर बांध्याची लावणी ही तमाशातून सादर केली जाते. लावणीच्या जन्म पूर्व पेशवाईत झाला आणि पानिपतपासून पुढे पेशवांच्या अस्तापर्यंत तर ती प्रत्ययही बहरत गेली. लावणीच्या जन्माचा आणि विकासाचा कालखंड म्हणजे मराठी साम्राज्याच्या ऐश्वर्याचा व अधिकारांच्या उपभोगाचा कालखंड मनोरंजन करणे व समाजाचे प्रबोधन करणे या हेतूने लावणीची निर्मिती झाली आहे. तर म. वा. धोंड यांच्या मते, ''सर्व सामान्यजनांच्या मनोरंजनासाठी त्यांना सुचतील अशा लौकिक, पौराणिक वा आध्यात्मिक विषयांवर रचलेली कडे यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार रचना म्हणजे लावणी''[७६] होय. अशी लावणीची व्याख्या केली आहे.

अव्वल इंग्रजी कालखंडापर्यंत चालत आलेल्या लावणीचा उपयोग, 'शेतकऱ्यांच्या जीर्णोद्धार' या जीवन ध्येयासाठी भालेकरांनी केला. त्यांनी शेतकऱ्यांच्या दु:खी व दारिद्र्य जीवनावर प्रकाश टाकून 'उपदेशपर लावणी लिहिली'. या लावण्यातून ग्रामीण जीवनाच्या चित्रणावर जास्त प्रभावीपणे भर देण्यात आला आहे. तत्कालिन ग्रामीण जीवनामध्ये 'अज्ञान', 'अडाणीपणा', 'निरक्षरता' हा भाग स्थायी रूपाने प्रकट होतो. त्यात अनुकूल बदल व्हावा, जागृती व्हावी, लोकांनी शिकावे या जाणिवेने भालेकरांनी ग्रामीण चित्रे त्यांच्या लावण्यातून रेखाटली आहेत. 'पाटील-कुलकर्णी', 'चाल', 'कष्टकरी', 'राजाचा दरबार', 'दारुबाज', 'कुलकर्णी पठ्ठा', 'दुकानदार', 'शेटजी' व 'भालेकरकृत उपदेशपर लावण्या' या त्यांच्या लावण्या प्रसिद्ध आहेत.

'पाटील – कुळकर्णी' या लावणीमध्ये भालेकरांनी पाटील अडाणी, अशिक्षित आहे. हे पाहून कुळकर्णी त्याची कशी फसवणूक करतो हे सांगितले आहे.

''पाटीलबुवा बैल वशींड्या बोलण्यामध्ये पोपट।
लिहिण्याचे नावाने पूज ती रेघ निशाणी धोपट'' ।।८६ ।।
''अक्षरशत्रू पाटील लोक गर्वाची आबरू।

प्रसंग येता भिऊन पळता घाबरू घाबरू'' ।।८७।।[७७]

सरकारकडून आलेला लखोटा अडाणी पाटलाला वाचता येत नाही. तो लखोटा वाचून घेण्यासाठी कुळकर्ण्यांच्या हातापाया पडत असतो. पाटलाला शिपायाच्या बोलावणे येते. पाटील कचेरीत जाऊन मामलेदाराचे बोलणे खातो.

''पशुसारखे ठोंबे असून । काय तुम्हांसी हुद्दा देऊन ।

खोटे काम हे पुढे होऊन । तुम्ही केले लागी लावून'' [७८]।।८८।।

अज्ञानी पाटलाचे चित्रण करताना 'वशिंडा बैल' अशा शब्दांचा वापर केला आहे. त्यावरून अज्ञान, निरक्षरता हे दोष दिसून येतात. यासाठी सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे. असा भालेकरांनी उपदेश केला आहे. भालेकरांनी बोली भाषेचा वापर केला आहे. सुशिक्षित व अशिक्षित या दोन गोष्टी मधील भेद स्पष्ट केला आहे. यातून तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडते. यातून परिणामकता दिसून येते.

'गावगुंड, अडमुठा, लुटितो, कुलकर्णी पठ्ठा' या लावणीतून कुलकर्णी पठ्ठाचे चित्रण येते. कुलकर्णी हा खेडेगावचा लेखणीचा कारभारी असतो. यामुळे गावातील सर्व लेखणीचे अधिकार त्याच्याकडे असतात. कुलकर्ण्यांच्या धाकाला सर्व घाबरत असतात. म्हणून भालेकर म्हणतात... ''गावढे लोक फार भोळे जी, अज्ञानाने झाले गोळे जी'' या शब्दात भालेकरांनी अज्ञानी लोकांचे वर्णन केले आहे. यातून त्यांची निर्भिड व झुंझारवृत्ती दिसून येते. 'भालेकरकृत उपदेशपर लावण्यां'तून कुलकर्णी म्हणे पाटलाला 'नकोरे कुरकुर पाटला नको रे कुरकुर' आम्हांला तुम्ही आहे. 'अवघ्ये तोंडाचे गबरु' तुम्ही नुसते नावाला पाटील आहात -

''याचे त्याला, सांगे भलत्याला, म्हणे कर्त्याला मला भजा

देई लंगोट्या, थापा खोट्या, आणीक मोठ्या डौलाने''[७९]।।८९।।

असा हा कुलकर्णी सतत भांडणे लावत असत. अशा या पाटलाच्या अज्ञानाचा, भोळेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांना कसे लुबाडतात, नाडतात, आर्थिक शोषण करतात याचे चित्रण साध्या, सोप्या, सरळ भाषेतून स्पष्ट केले आहे.

भालेकरांनी 'दुकानदार शेटजी'ची व्यक्तिरेखा रेखाटली आहेत. हा शेटजी आपण खूप 'सभ्य' असल्याचा आव आणून 'ज्ञानोबाची व विठोबाची शपथ' घेत असतो. म्हणून भालेकरांनी कठोर प्रहार केला आहे.

''दुकानदारजी, लफंगे फार, लुटीती आम्हा अनिवार'' ।।९० ।।[८०]

असे म्हणून शेटजी लोकांना गोड बोलून फसविण्याचा प्रयत्न करतात. वजन मापात कमी-जास्त करून मापात घासाघीस करतात. सुट्टे पैसे घेऊन गट्टा खिशात घालत असतात. माल परत केला तर शिव्या देऊ लागतात. म्हणून भालेकरांनी म्हटले आहे. 'नका लावू बट्टा अबरूला' असे भालेकरांनी खडसावून समाचार घेतला आहे.

'शेटजी' बरोबर 'भटजी' या शब्दांतच यमक जुळवलेला आहे. या 'भालेकरकृत लावणी' मधून तिथी, वार, नक्षत्र, शुभ वेळ यासारख्या अंधश्रद्धांना विरोध करून भटजीवर ताशेरे ओढले आहेत.

''पहा वेळ शत्रुने वेढीले आंग हो ।। हातचे हाती।। राहून गेले पंचांग''[८१] ।।८१ ।।

काढा पाहू वेळ जग जिंकायासी जाऊ हो। नको ते सैन्य शास्त्री ज्योतीषा नेऊ''।।९१ ।।[८१]

स्वार्थी, ढोंगी भटजी आपला स्वार्थ साधून अडाणी रयतेला कसे लुबाडतात याचे मार्मिक चित्रण उभे केले आहे. सर्व मुहूर्त पाहून पंचांगानुसार कार्य करीत असतात. मुहूर्त पाहून लग्ने लावली जातात. तरी स्त्रिया विधवा का होतात?, लढाई मुहूर्त पाहून केली जाते मग पराजय का होतो?, शनिवार वाडा का पडला? हे प्रश्न विचारून भालेकरांनी चांगलेच खडसावले आहे. भविष्य, मुहूर्त हे सर्व खोटे, फसवे आहे. आपले पोट भरण्यासाठी शेटजी, भटजी यांनी षड्यंत्र रचले आहे. याच्यावर भालेकरांनी घणाघाती टीका केली आहे. भालेकरांनी भटजीला 'गोचिड' शब्दांची उपमा दिली आहे. कारण 'गोचिड' एकदा अंगाला चिकटली की लवकर सुटत नाही. त्याप्रमाणे धूर्त भटजी आपली तुंबडी भरून घेईपर्यंत सुटत नाही. यासाठी भालेकर म्हणतात, 'कुंभाडया द्याया फाशी'.

कृष्णराव भालेकरांची 'कष्टकरी' ही लावणी हृदयाला चटका लावणारी आहे. या लावणीतून कष्टकऱ्यांच्या वाट्याला आलेल्या दु:खाचे वर्णन भालेकरांनी अत्यंत तळमळीने केले आहे. दिवसभर शेतात कष्ट करूनही अन्न, वस्त्र मिळत नाही. म्हणून -

"कोण दु:ख नेईल हे हिरून । घालू त्यासी पोटामध्ये चिरून ।

हो अज्ञान जाईल ते सरून ।।९३ ।।

हिंदु पशु जगती जणू चरून । काय त्यांना घरे पांघरूण ।

असे परके जाणती दुरून । हो भालेकर म्हणे सांवरून[८२] ।।९४ ।।

असे पशुप्रमाणे कष्टकऱ्यांचे जीवन व्यतित केले आहे. भालेकरांनी शेतकरी, कष्टकरी, मजूर यांच्या हीनदीन स्थितीवर प्रकाश टाकला आहे. शेटजी-भटजी, कुलकर्णी-सावकार हे मिळून या कष्टकऱ्यांना देवा-धर्माच्या, पाप-पुण्याच्या नावाखाली लुबाडतात. शेतकरी आयुष्यभर कसा कर्जात राहिल याची तजवीज करून ठेवली आहे. तो अज्ञानी जळमटातून बाहेर पडू नये अशी व्यवस्था केली आहे. ही वस्तुस्थिती भालेकरांनी मांडली आहे.

'राजाचा दरबार' या लावणीमध्ये राजाचा दरबार म्हणजे सर्व खेळ पैशाने चालतोय! या दरबारामध्ये येणाऱ्या पाटील सर्व सामान्य जनतेची घोंगडी, लंगोटी पाहून दरबारातील नोकर त्यांची कुचेष्टा करतात. त्यांना हिडीस फिडीस करतात. हीनतेची वागणूक दिली जाते आणि त्यांना 'जोड्याची जागा' दाखवितात. खेड्यातील लोक हे रानावनातून फिरणारे असतात - 'चुना, तंबाकू खाऊन हवे तेथे थुंकणारे' त्यामुळे त्यांना कसे बोलावे, मुखत्यारपत्र, वकीलपत्र, नोटीस याचे काही ज्ञान नसते. नोकर वर्ग व्यवस्थित माहिती देत नाही. त्याचाच गैरफायदा घेऊन, 'लाच खाण्याचा मोठा सपाटा चालविला' या सर्वसामान्य जनतेने कोणापाशी तक्रार करायची म्हणून भालेकर म्हणतात -

"गावोगावी नेमा पंच न्याय अपसात ।

म्हणे भालेकर मिळेल सुख थोड्या दिवसात"[८३] ।।९५ ।।

'दारुबाज' ही लावणी अत्यंत महत्त्वाची असून व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाची वाताहत कशी होते. हे भालेकरांनी सांगितले आहे. दारुमुळे घरादाराचा विद्ध्वंस होतो. दारुबाज ही व्यक्ती स्वत:चे घर, वस्तू एवढेच काय पण स्वत:चे पागोटे सुद्धा गहाण ठेवतो. यामुळे घरातील बायकामुलांचे अतोनात हाल होतात. दारुबाज हा कुटेही गाढवासारखा लोळत असतो. 'पडे बदाबदा, हसे गदगदा' म्हणून भालेकर म्हणतात -

"दारुचा नाद हा खोटा, सर्वदा तोटा" [८४] ।।९६ ।।

दारुमुळे माणसांचे आयुष्य उद्ध्वस्त होते म्हणून दारुचा नाद सोडून द्या. असा उपदेश केला आहे. यातून त्यांनी उपरोधिक वर्णन करून व्यसनाचा धिक्कार केला आहे.

**सारांश -**

लोकशिक्षणासाठी भालेकरांनी लावणीचा वापर केला आहे. 'पाटील-कुळकर्णी' या लावणीतून तत्कालीन कार्य करण्याच्या पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. सुरुवातीला चावडोत डौलात बसणारे पाटील-कुळकर्णी पण लखोटा वाचण्याची वेळ पाटलावर येते. तेव्हा त्याची झालेली अवस्था कुलकर्ण्यांच्या हातापाया पडून सारे काम त्याच्यावर सोपवून निघून जातो. विद्या नसल्यामुळे पाटील स्वत:चे अधिकार वापरू शकत नाही. हा कवितेतला प्रसंग नाट्यात्मक आहे. लोकांना अज्ञानामुळे पाटलाची फजिती होते हे नजरेस आणून दिले आहे. 'मुहूर्त' या कवितेतून ज्योतिष, नावरस पहाणे, मुहूर्त पाहून सर्व विधी करणे या अंधश्रद्धांचे वर्णन घडविले आहे. वरील समस्यांबाबत आव्हान केले आहे. 'राजाचा दरबार', 'कुलकर्णी पट्टा' या मधून तत्कालिन कारभार कसा चालत असे यावर विदारक प्रकाश टाकला आहे. तर 'दारुबाज लावणीतून' व्यसनाच्या आहारी गेलेल्या दारुबाजच्या कुटुंबाची वाताहत कशी होते हे स्पष्ट केले. त्यांची भाषा, साधी, सोपी, गेय आहे. तत्कालीन समाज जीवनाचे दर्शन घडविले आहे.

BA... B ... S... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**श्रीखंड :**

'दीनमित्र' एप्रिल १८८८ अंकामधून 'श्रीखंड' प्रसिद्ध झाले आहे. भालेकरांनी आपल्या रचनेला 'श्रीखंड' हे नाव दिले आहे. श्रीखंडात एकूण पाच पदे आहेत. यातून भालेकरांनी नीतीबोधाची शिकवण दिली आहे.

देशासाठी जो आपुल्या प्राणाची आहुती देतो. त्याचे आयुष्य कसे साजिरे होते. दुसऱ्यासाठी जो प्रामाणिकपणे कष्ट करतो तो ''सर्वाहुनि श्रेष्ठ'' आहे. याची भालेकरांनी उदाहरणे दिली आहेत. फौजेपेक्षा विमान केव्हाही श्रेष्ठ आहे. विजेच्या गोळ्यापुढे बंदुकवाल्याचे बंदुकीच्या गोळीपुढे, गोफण वाल्याचे गोफणीमुळे, भाल्याच्या मारापुढे, तलवारीच्या वारापुढे, पहेलवानीची शक्ती सामर्थ्य टिकाव धरु शकणार नाही. नपुसंक लोकांपेक्षा स्वार्थी व दुराचारी व्यक्तींपेक्षा दुर्जन व मत्सरी बरा म्हणून भालेकर म्हणतात, भित्र्या माणसापेक्षा चांडाळ मनुष्य बरा कारण –

''भित्र्या घाबऱ्यांचे जिणें। पशुहुनी दैन्यवाणे''[८५]।।९७।।

भालेकरांची श्रीखंड नं. २ ची सुंदर रचना आहे. यामधून विद्वान व मूर्ख यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे.

''विद्वानांचा मान मोठा। नाही सुखाशी हो तोटा''[८६]।।९८।।

तर मूर्खांच्या बाबतीत 'रुपवान गोरा दिसे, गुणाविन मढें जसे य'' हट्टी, खोडकर, मूर्ख, अडाणी, करंटा, झोपाळू ही विशेषणे वापरून ते म्हणतात – ''मूर्ख अडाण्यापासून बरा म्हणावा पाषाण''. भालेकरांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती दिसून येते. यातून त्यांनी बारकावे टिपलेले आहेत. एक साहित्यिक म्हणून समाज निष्ठ भूमिका स्वीकारली आहे. ज्या पक्षाची बाजू मांडली आहे त्याचे प्रतिबिंब भालेकरांच्या साहित्यातून उमटले आहे.

''नका पेटू अभिमान। शुद्ध अंत:करण ज्याचें। वंदा पाऊल तयांचे।।

दीनांसाठी दीनबंधू। झाला जन्मता आनंदु'[८७]।।९९।।

देशातील नीतीवंत, कृपावंत या गुणांनी श्रीमंत होऊन, दीनांसाठी दीनबंधू झाले पाहिजे. 'विद्यारूपी' व 'उद्योगरुपी' शिक्षण द्या 'अफू गांजा दारु घोटी।।

याची संगत ती खोटी म्हणून भालेकर म्हणतात – उद्योग करा.

"उद्योगाने कीर्ती गाजे, उद्योगाने होती राजे

विचाराने काही करा, हेचि शोभे नारी नरा" [८८]।।१००।।

उद्योग करा, उद्योगाने नावलौकिक होईल. याबरोबरच आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा निर्धार पाळा. म्हणजे 'सर्व सुखे येती घरा' निष्कामी राहिलेल्या व्यक्तीला डौल राजाचा पण शोभा येते बैलपोळ्याची. "नाव असे इनामदार, कर्जाखाली झाले ठार".

विद्या नसेल तर मनुष्याच्या जीवनाला काही अर्थ नाही जर विद्यारुपी अवयव नसतील तर हात, पाय, डोळे असून ते अधू असतील त्याला बाहेरच्या सृष्टीचे सुख लाभणार नाही. 'तमासगीर पापे पेरी। रोपे निवडुंगाची बरी' यातून भालेकरांनी 'विद्या शिका' हा संदेश दिला आहे. जो शिक्षण घेत नाही 'सर्वांहुनि तो आळशी' असे मूलगामी विचार श्रीखंड नं. ४ मधून मांडले आहेत.

पाचव्या श्रीखंडात भालेकरांनी समाजास सत्यचरणाबाबत आदर्श घालून दिला अहे. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव या त्रिसूत्राचा वापर केला आहे. कोणताही भेदभाव न करता सर्वांशी सर्वधर्म समभाव या विचाराने वागले पाहिजे. अशा नीतीमत्तेने वागण्याचा उपदेश भालेकरांनी केला आहे. यासाठी –

"जोवर नाही एक जाती। तोंवर संकटें न जाती" [८९]।।१०१।।

अशाप्रकारे भालेकरांनी साधी, सोपी रचना करून तत्कालिन समाजस्थितीचे वर्णन केले आहे. समाज प्रबोधन करणे या हेतूने भालेकरांनी श्रीखंडाची निर्मिती केली आहे. यातून योग्य उपदेश देऊन त्यांनी मोलाची शिकवण दिली आहे.

**कलियुगाचे भय :-**

'कलियुगाचे भय' ही कृष्णराव भालेकरांची स्फुट काव्यरचना आहे. कलियुगाचे भय म्हणजे धूर्तांचा कावा हे भालेकरांनी स्पष्ट करून सांगितले आहे. 'सत्ययुग' व इतर युगातील गुप्तभाग याची माहिती भालेकरांनी सांगितली आहे. त्याबरोबरच तत्कालिन धर्मश्रद्धांची, देवदेवतांची, चिकित्सा केली आहे. भालेकरांनी प्रथम सत्ययुगातील गुप्त माहितीचे वर्णन

केले आहे. सत्ययुगातील सर्व सत्य आहे तर देवांचा मृत्यू का झाला? ब्रह्मदेव स्वत:च्या मुलीला का भुलला? वेद अनादी पाण्यामध्ये का बुडाले? वामनाने बळीराजाची फसवणूक का केली? रामाची सीता चोरून का नेली? एक स्त्री आणि पाच नवरे याला व्यभिचार की शांतता म्हणावी? जो स्वत:ला ऋषी म्हणवून घेतो आणि परस्त्रीशी व्यभिचार करतो. कोळ्याच्या मुलाशी कामांध होऊन तिला सुगंधी बनवतो याला ऋषी का म्हणावे? सर्व जगाचा पिता विष्णू असून, त्याला एका ब्राह्मणाने लाथा का माराव्यात? असे एकाचढ एक प्रश्न भालेकरांनी विचारले आहे. म. फुले यांच्या प्रमाणेच भालेकर यांनी सत्ययुगातील देव अवतारांची चिकित्सा करून ते सांगतात -

"तुम्हापुढे आहे आता सत्य ते निवडा"[१०]।।१०३ ।।

परंपरागत चालीरीती, दुष्ट रुढी, विचार-आचार यावर भालेकरांनी कडक टीका केली आहे. कलियुग व सत्ययुगातील देवावतार यांची चिकित्सा केली आहे. अशाप्रकारे महात्मा फुले यांनी दहा अवतारांची चिकित्सा केली आहे. या विवेचन पद्धतीचा परिणाम येथे जाणवितो. कलियुगाचे भय दाखवून या भटजींनी अशिक्षित लोकांचा गैरफायदा घेऊन त्यांना लुटले आहे. हे सर्व ढोंग, फसवणूक आहे, असे सांगून बहुजन समाजाची सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न भालेकरंनी केला आहे.

**सारांश :**

कृष्णराव भालेकरांनी आपल्या रचनेस 'श्रीखंड' हे नाव दिले. या श्रीखंडातून नीतीमत्तेने वागण्याचा, व्यसनापासून दूर राहण्याचा, मुलांना शाळेत घालण्याचा व जातिभेद विषमता नष्ट करण्याचा उपदेश केला आहे. तर 'कलियुगाचे भय' या स्फुट काव्यरचनेत सत्ययुगातील देवांच्या कथांची चिकित्सा केली आहे. धूर्तांनी आपले मतलब साधण्यासाठी ग्रंथरचना करून शूद्रादिशूद्रांना अज्ञानात गुरफटून टाकले आहे. ते शहाणे होऊ नयेत म्हणून 'कलियुगाचे भय' दाखवून त्यांना अंधारात ठेवले आहे. यातून बाहेर काढण्यासाठी भालेकर म्हणतात, "तुम्हापुढे आहे आता सत्य ते निवडा" असा विचार त्यांनी समाजावर सोपविला आहे. भालेकरांची भाषा साधी, सोपी, हृदयाला भिडणारी आहे. यातून परखडपणा व

उपहास जाणवतो. समाजस्थितीचे दर्शन व प्रबोधन घडविण्यासाठी भालेकरांनी काही ठिकाणी कठोर भाषाही वापरली आहे.

**उपसंहार :**

कृष्णराव भालेकर हे प्रतिभासंपन्न कवी आहेत. त्यांनी काही पोवाडे, लावणी, अभंग, पदे, श्रीखंड व स्फुट काव्यरचना लिहिले. तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडविण्यासाठी एकूण सात पोवाडे लिहिले आहेत. त्यामध्ये 'आमचे कारागीर' या पोवाड्यातून भारतीय कारागीर व परदेशी कारागीर यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. ब्रिटीश राजवट येण्यापूर्वीची देशाची स्थिती व आगमनानंतरची स्थिती याचे वर्णन 'पूर्वीची व साप्रंतची स्थिती' या पोवाड्यातून केले आहे. पेशवाई व इंग्रजी राजवट यांच्यातील तुलना केली आहे. पेशवाईच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत. 'कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती' ही वाचाळ-निरर्थक बडबड बंद करावी अशी विनंती केली आहे. याचा समाज प्रबोधनासाठी काहीही उपयोग होत नाही. हे पोवाड्यातून व्यक्त केले आहे. 'राघू गाडीवानाचा पोवाडा' यातून शेतकऱ्याचा दु:खसागरच वर्णिला आहे. शेतकऱ्यांना वेठीस धरण्याच्या पद्धतीमुळे त्यांच्यावर ओढवणाऱ्या दु:खाचे चित्रण कले आहे. तत्कालीन समाजस्थितीचे वर्णन करणारा भालेकरांचा 'लोकल फंडाचा पोवाडा' आहे. जुलमी, अन्यायी प्रवृत्तीने सरकार शेतकऱ्यांकडून कर कशा प्रकारे वसूल करते याचे मार्मिक चित्रण केले आहे. 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाड्यातून सावकार आणि ब्राह्मण भिक्षुकांच्या अमर्याद अधाशीपणामुळे शेतकऱ्यांना ही वाईट अवस्था प्राप्त झाली आहे. शेतकऱ्यांचा अज्ञानीपणा व अशिक्षितपणा यामुळेच त्यांची अशी अन्नानदशा झाली आहे. अशी भालेकरांनी शेतकऱ्यांच्या वाताहतीची कारणे सांगून 'अन्नछत्रे नको पण विद्यासत्रे घाला' हा मार्ग सुचविला आहे. मानवी हक्कांसाठी 'अनार्याचे गाऱ्हाणे' मांडणाऱ्या पोवाड्यातून आर्य अनार्य संघर्ष भालेकरांनी स्पष्ट केला आहे. शूद्रातिशूद्रांवर होणाऱ्या अन्यायाचा धिक्कार करणारा, दारिद्र्य, अज्ञानाने गांजलेल्या एका पोखरलेल्या समाजस्तराच वास्तव घडविणारा पोवाडा आहे.

सामान्य माणूस श्रोता म्हणून डोळ्यांसमोर ठेवून या पोवाड्याची निर्मिती केली आहे. जनसामान्यांच्याबद्दल भालेकरांच्या मनात उत्कट जिव्हाळा, आपुलकी, करुण रसाचा अविष्कार केला आहे. शेतकरी, कारागीर, मजूर यांची दु:खे मोजक्या शद्बांत मांडली आहेत. या पोवाड्यातून तत्कालीन समाजजीवनाचे वास्तव दर्शन घडविले आहे.

मध्ययुगीन साहित्यातील 'अभंग'हा रचना प्रकार आहे. कृष्णराव भालेकरांनी 'हितोपदेश' नावाची अभंग रचना केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेला उपदेश म्हणजे 'हितोपदेश'. अशी आगळी वेगळी रचना केली आहे. यामध्ये एकूण १६ अभंग व हिंदी पदे आहेत. या अभंगातून शूद्रांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, धार्मिक-आर्थिक शोषण, सामाजिक विषमता, जातिभेद, दैव, दैवभोळेपणा, अज्ञान, निरक्षरता या परिणामाना सामोरे जाण्यासाठी भालेकरांनी विद्येची महती पटवून सांगितली आहे. 'पाटील-कुळकणी', 'शेटजी-भटजी', 'सावकार-सरकार' हे त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत.

अभंगाची भाषा अत्यंत सोपी आहे. प्राचीन काव्यपरंपरेपेक्षा भालेकरांची अभंगरचना वेगळी होती. हा प्रकार प्राचीन साहित्यातील काव्यप्रकार असला तरी मात्र आशय मात्र आधुनिक आहे. यात शेतकऱ्यांच्या दु:खाची कारणमीमांसा केली आहे. सत्यस्थितीचे हृदयभेदक चित्रण केले आहे. दास्यत्वापासून मुक्ती मिळावी यासाठी 'विद्या शिका' असा उपदेश केला आहे. अज्ञानाच्या जळमटातून शेतकऱ्यांनी बाहेर पडू नये म्हणून भिक्षूकवर्गाने आपल्या हिताच्या ग्रंथरचना केल्या आहेत पण भालेकरांनी संधीसाधू पुरोहित वर्गाचे पितळ उघड पाडले आहे.

'शेतकऱ्याचे मधुर गायन' हा भालेकरांचा काव्यसंग्रह ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारा आहे. एकूण ३२ पदे आहेत. या कवितेतून शेतकरी जीवनाचा सर्वांगिण विचार व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांचे कष्टप्रद जिणे, त्यांची फसवणूक व पिळवणूक करणारे घटक, रात्रंदिवस शेतात राबूनही पोटाला अन्न वस्त्र मिळत नाही. याउलट शेटजी, भटजी, कुलकर्णी यांची जीवन जगण्याची पद्धत भालेकरांनी व्यक्त केले आहे. शेतकरी देशाचे पोषक, बळीरायाचे वंशज आहेत. काबाड कष्ट करुनही त्यांच्या नशिबाला अठराविश्वे दारिद्रयच.

त्यात भर मारवाडी, भटभिक्षुक, कुलकर्णी यांची होती. अज्ञानी शेतकऱ्याला विद्या नसल्यामुळे त्यांची फसवणूक होते. भिक्षुक व यजमान यांच्यातील तफावत स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर 'खोटे गुरु', 'मुहूर्त', 'सोवळ्या-ओवळ्या'तील फोलपणा स्पष्ट केला आहे. यातून मुक्तता करण्यासाठी 'विद्या' शिकण्याचा मार्ग सुचविला आहे. शेती, शेतकरी, शेतकऱ्यांची मुले, शेतकरणी, शेतकरी वीर - अंगणा, यांचा गौरव केला आहे.

भालेकरांची ही कविता अतिशय हृदयस्पर्शी आहे. खेड्यापाड्यातील जनतेशी या कवितेचे अगदी जवळचे नाते आहे. भालेकरांनी शेतकऱ्यांच्या दु:खस्थितीचे निरीक्षण वर्णन यथार्थपणे केले आहे. वाचकांचे लक्ष खेचून घेण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे.

'भालेकरकृत उपदेशपर लावण्या'तून भालेकरांनी लोकशिक्षणासाठी लावणीचा वापर केला आहे. 'पाटील-कुळकर्णी' या लावणीतून तत्कालीन कार्य करण्याच्या पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. 'मुहूर्त' या कवितेतून अंधश्रद्धांचे दर्शन घडविले आहे. तर 'राजाचा दरबार', 'कुलकर्णी पठ्ठा' यामधून तत्कालीन कारभार कसा चालत असे यावर विदारक प्रकाश टाकला आहे तर 'दारूबाज' या कवितेतून व्यसनी माणसाच्या कुटूंबाची वाताहत कशी होते हे स्पष्ट केले आहे. हे भालेकरांनी साध्या, सरळ व सोप्या भाषेतून व्यक्त केले आहे. त्याचबरोबर गेयता हा काव्यगुण आढळतो.

कृष्णराव भालेकरांनी आपल्या रचनेस 'श्रीखंड' नाव दिले आहे. या रचनेत एकूण पाच पदे आहेत. नीतीमत्तेने वागणे, व्यसनापासून दूर रहाणे, आपल्या मुलांना शाळेत घालणे, जातीय विषमता नष्ट करणे हा संदेश दिला आहे. ही काव्यरचना व्यवहारिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. तुलनात्मक विचार मांडून लोकांच्या मनावर ठसविले त्यामुळे ही काव्यरचना लक्षणीय ठरली आहे.

'कलियुगाचे भय' ही भालेकरांची स्फुटकाव्य रचना आहे. सत्ययुगातील देवतांची चिकीत्सा केली आहे. महात्मा फुले यांनी अशा प्रकारे दहा अवतारांची चिकीत्सा केली आहे. या विवेचन पद्धतीचा परिणाम भालेकरांच्या लेखनात जाणवतो. परंपरागत चालीरीती,

रुढी, परंपरा, आचार-विचार यावर भालेकरांनी कठोर प्रहार केला आहे. खरे काय नि खोटे काय याचा विचार वाचकांवर सोपवून 'विद्या घ्या' असा उपदेश केला आहे.

या रचनेत उपहास व परखडपणा जाणवतो. ही काव्यरचना प्रबोधनपर आहे. शेतकऱ्यांच्या मनात भालेकरांच्या विषयी जिव्हाळा जाणवतो. त्यांच्या जीवनातील दु:खामागच्या छोट्या मोठ्या गोष्टींची चिकित्सा करुन त्या गोष्टी समाजासमोर आणल्या आहेत.

भालेकरांनी लोकांच्यामध्ये प्रचलित असणारे अभंग, लावणी, पोवाडे या काव्यप्रकाराचा अवलंब करून तत्कालीन सामाजिक जीवनाचे चित्रण केले आहे. शेतकरी, कष्टकऱ्यांची दु:खे, अन्याय व्यक्त केला आहे. त्यांच्या दु:खांची कारणमीमांसा के ली आहे. यातून 'विद्या' घेण्याचा संदेश दिला आहे. भाषा साधी, सोपी हृदयाला भिडणारी आहे. समाजस्थितीचे दर्शन व प्रबोधन घडविले आहे.

विषयांचा तोच तो पणा काही वेळा आढळतो. पण भालेकरांना मनोरंजनासाठी काव्यरचना करावयाची नाही. त्यांची कविता समाजप्रबोधनासाठी आहे. त्यामुळे समाजवास्तव मांडून ते शेतकरी-कष्टकरी जनतेच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करतात. त्यांची फसवणूक मांडून त्यांना सावध करण्याचा प्रयत्न करतात. पिढ्यानपिढ्या कष्टकरी, शेतकरी जनतेच्या मनावर ठाण मांडून बसलेल्या धार्मिक समजूतीना आव्हान देणे, त्यातील फोलपणा सांगणे भालेकरांना गरजेचे वाटते. तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडविणारी भालेकरांची ही कविता आहे.

**संदर्भ सूची:**


१. ल. रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', तिसरी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, पृ. २५२.

२. 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', संपा. सीताराम रायकर, महात्मा फुले, समता प्रतिष्ठान प्रकाशन, पुणे, पृ. १

३. तत्रैव, पृ.२.

४. तत्रैव, पृ.२.

५. तत्रैव, पृ.२.

६. तत्रैव, पृ.३.

७. तत्रैव, पृ.३.

८. तत्रैव, पृ.३.

९. तत्रैव, पृ.४.

१०. तत्रैव, पृ.४.

११. तत्रैव, पृ.४.

१२. संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश, जी.आर. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, ९ सप्टेंबर १९९९.

१३. उनि, कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय, पृ. ५.

१४. तत्रैव, पृ. ५.

१५. तत्रैव, पृ. ५.

१६. तत्रैव, पृ. ६.

१७. तत्रैव, पृ. ६.

१८. तत्रैव, पृ. ६.

१९. तत्रैव, पृ. ७.

२०. तत्रैव, पृ. ७.

२१. तत्रैव, पृ. ७.

२२. तत्रैव, पृ. ८.

२३. तत्रैव, पृ. ८.

२४. तत्रैव, पृ. १०.

२५. तत्रैव, पृ. १०.

२६. तत्रैव, पृ. ११.

२७. तत्रैव, पृ. ११.

२८. तत्रैव, पृ. ३९.

२९. तत्रैव, पृ. ४०.

३०. तत्रैव, पृ. ४१.

३१. तत्रैव, पृ. ४१.

३२. तत्रैव, पृ. ४१.

३३. तत्रैव, पृ. ४२.

३४. तत्रैव, पृ. ४२.

३५. डॉ.सौ. हेमलता गायकवाड, 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता एक अभ्यास', प्रथमावृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, एप्रिल १९९७, पृ. १५.

३६. उनि, 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय हितोपदेश', पृ. १२, १३.

३७. तत्रैव, पृ. १६.

३८. तत्रैव, पृ. १३.

३९. तत्रैव, पृ. १७.

४०. तत्रैव, पृ. १४.

४१. तत्रैव, पृ. १६.

४२. तत्रैव, पृ. १९.

४३. तत्रैव, पृ. १७.

४४. तत्रैव, पृ. १८.

४५. तत्रैव, पृ. १८.

४६. तत्रैव, पृ. १८.

४७. य.दि. फडके, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती पाचवी, पृ. १९५.

४८. उनि, 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', शेतकऱ्यांचे मधुरगायन, पृ. २०.

४९. तत्रैव, पृ. २१.

५०. तत्रैव, पृ. २१.

५१. तत्रैव, पृ. २१.

५२. तत्रैव, पृ. २५.

५३. तत्रैव, पृ. २१.

५४. तत्रैव, पृ. २२.

५५. तत्रैव, पृ. २३.

५६. तत्रैव, पृ. २८.

५७. तत्रैव, पृ. २६.

५८. तत्रैव, पृ. २७.

५९. तत्रैव, पृ. २७.

६०. तत्रैव, पृ. २८.

६१. तत्रैव, पृ. ३०.

६२. तत्रैव, पृ. ३१.

६३. तत्रैव, पृ. २५.

६४. तत्रैव, पृ. २२.

६५. तत्रैव, पृ. २२.

६६. तत्रैव, पृ. २४.

६७. तत्रैव, पृ. २६.

६८. तत्रैव, पृ. २६.

६९. तत्रैव, पृ. २८.

७०. तत्रैव, पृ. २९.

७१. तत्रैव, पृ. २५.

७२. तत्रैव, पृ. २४.

७३. तत्रैव, पृ. ३०.

७४. तत्रैव, पृ. ३०.

७५. मो.नि. ठोके, 'रा.ना. चव्हाण निवडक वाङ्मय', पारस प्रकाशन, बेळगांव, १ मार्च, १९८०, पृ. ५५४.

७६. म.वा. धोंड, 'मराठी लावणी', प्रथमावृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई, १९५६, पृ. १०६.

७७. उनि. 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', 'भालेकरकृत उपदेशपर लावण्या' पृ. ३२–३५.

७८. तत्रैव, पृ. ३३.

७९. तत्रैव, पृ. ३६.

८०. तत्रैव, पृ. ३४.

८१. तत्रैव, पृ. ३५.

८२. तत्रैव, पृ. ३३.

८३. तत्रैव, पृ. ३३.

८४. तत्रैव, पृ. ३४.

८५. तत्रैव, पृ. ४३.

८६. तत्रैव, पृ. ४३.

८७. तत्रैव, पृ. ४४.

८८. तत्रैव, पृ. ४५.

८९. तत्रैव, पृ. ४६.

९०. तत्रैव, पृ. ४८.

९१. तत्रैव, पृ. ४८.